अहम् आवाम्

वयम्

वर्ष दहावे | अंक ३ | ऑगस्ट २०२२ | पृष्ठे ५२

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य ₹ ९०/-

आपण कोण?

हरहुन्नरी मुलांचा शोध-प्रकल्प!

आयोजक
Institute For Psychological Health (IPH)
आणि 'वयम्' मासिक

हरहुन्नरी मुलांसाठी 'बहुरंगी बहर' स्पर्धा

लॉकडाऊनपूर्वीच्या चार वर्षांमध्ये तुफान यशस्वी ठरलेल्या 'बहुरंगी बहर' स्पर्धेचं हे पाचवं वर्ष.. तुम्हांला सहभागी व्हायला मजा येईल अशी ही स्पर्धा!

Institute for Psychological Health (IPH) आणि 'वयम्' मासिक यांच्या संयुक्त विद्यमाने **इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी 'बहुरंगी बहर' ही एक अनोखी व्यक्तित्त्व स्पर्धा** घेण्यात येते.

एकाच वेळी अनेक विषयांत रस असणाऱ्या हरहुन्नरी मुलांचा शोध घेणारी ही स्पर्धा आहे. बहुअंगाने बहरत असलेल्या, सत्वशील आणि योग्य दिशेने विकसित होत असलेल्या किशोरवयीन विचारी मुलांना व्यासपीठ मिळवून देणं, हा या स्पर्धेचा हेतू आहे.

पहिल्या फेरीत असेल एक रंजक प्रश्नावली.

निवडक मुले पुढच्या फेरीसाठी पात्र ठरतील.

गटचर्चा (५ नोव्हेंबर) व अंतीम कार्यक्रम (६ नोव्हेंबर २०२२) ठाण्यात होईल.

उत्तरपत्रिका १५ ऑगस्टपर्यंत पोहोचेल, याची काळजी घ्या.

अंतिम फेरीत निवडक स्पर्धकांना काही मान्यवर आणि तज्ज्ञ व्यक्तींना थेट भेटण्याची संधी मिळेल.

स्पर्धेत सहभागासाठी प्रवेश शुल्क १५० रुपये आहे.

स्पर्धेची प्रश्नावली मराठीत आहे, मात्र उत्तरे मराठीत, इंग्रजीत किंवा मिंग्लिशमध्ये लिहिली तरी चालतील. बहुरंगी बहरची प्रश्नावली डाऊनलोड करण्यासाठी **https://wayam.in/bahurangi-bahar-spardha.html** या लिंकला क्लिक करा. **www.wayam.in** किंवा **www.healthymind.org** या वेबसाइट पाहा.

अधिक माहितीसाठी- www.wayam.in / संपर्क क्र- 022-25986270/ मो. 9137128915

तुमच्या भरभरून प्रतिसादाची आम्ही वाट बघतोय...

शुभदा चौकर
मुख्य संपादक, 'वयम्'

डॉ. आनंद नाडकर्णी
कार्यकारी विश्वस्त, IPH

RNI NO.MAHMUL/2013/53138

अहम् आवाम्

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

वयम्

आपण सारे

वर्ष १० | अंक ३ | ऑगस्ट २०२२

श्रावण/भाद्रपद शके १९४४

प्रकाशक
श्रीकांत बापट

सल्लागार
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
अच्युत गोडबोले
राजीव तांबे
श्रीकांत वाड

मुख्य संपादक
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

मुखपृष्ठ
राज कांदळगांवकर

सुलेखन
अच्युत पालव

अंकातील चित्रे
गिरीश सहस्रबुद्धे, अदिती पाध्ये-देसाई, जुईली माहीमकर, आर्चिस टिळवे

वरिष्ठ उपसंपादक
क्रांती गोडबोले-पाटील

मांडणी-सजावट
क्रांती गोडबोले-पाटील

मुद्रितशोधन
शिवानी ओक

वितरण व्यवस्था
राजेंद्र गोसावी

'वयम् हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

संपादकीय विभाग :
'वयम् न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

अंतरंग

स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

संपादकीय : शुभदा चौकर- ४
राष्ट्रीय प्रतिज्ञा कोणी लिहिली? : नरेंद्र लांजेवार- ६
अक्षरबाप्पा : क्रांती गोडबोले-पाटील- ८
निसर्ग सखा : एकनाथ आव्हाड- १०
मिनू : अदिती पाध्ये-देसाई- ११
अय्यो : डॉ. निर्मोही फडके- १२
हिमती मुलांच्या कहाण्या : डॉ. मीना वैशंपायन- १६
कल्पककला : स्वरूपा वक्नाली- १९
जिव्हाळ्याचे बंध : कांचन जोशी- २०
पाऊसकाळ : भानुदास धोत्रे- २१
अँटिनावालं कासव : आरती कुलकर्णी- २२
पावसाचं पाणी : दासू वैद्य- २३
भिंतीची तहान : राजीव तांबे- २४
Hide & Seek : Juilee Mahimkar- २६
दिव्यांग रोल मॉडेल : शोभा नाखरे- २८
चपखल : प्रतिभा गोपुजकर- ३१
Think Positive... : Prachi Mokashi-३२
डोळे कुठे, किती! : मकरंद जोशी- ३६
क्लासिक : धनवंती हर्डीकर- ४०
माझे किशोरवय : डॉ. मोहसीना मुकादम- ४६

मुखपृष्ठाविषयी-

अक्षरगणेशकार राज कांदळगांवकर यांनी आपल्या 'वयम्'च्या नावात अक्षरबाप्पा साकारला आहे.

कागद, छपाई यांसह सर्व खर्च वाढल्याने जानेवारी २०२२ पासून 'वयम्' मासिकाचे वार्षिक शुल्क वाढवून डिलिव्हरी चार्जेससहित ते रु. ११०० करण्यात आले आहे. सध्याच्या सभासदांना त्यांचे सभासदत्व असेपर्यंत आधीप्रमाणेच अंक मिळत राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. **-संपादकीय आणि वितरण विभाग**

संपादकीय

स्वातंत्र्य आणि शिस्त!

'वयम्' दोस्तांनो,

सध्या मी 'स्वीडन' या युरोपीय देशात आलेय. या प्रगत देशाचं तुम्हांला सांगण्यासारखं वैशिष्ट्य म्हणजे मुलांना मारायला किंवा कोणतीही शारीरिक शिक्षा करायला बंदी घालणारा हा जगातला पहिला देश. मोठ्या माणसांनी लहान मुलांना थप्पड मारणं, धपाटा देणं, छडी/पट्टी मारणं, ओणवं उभं करणं अशी कोणतीही शारीरिक शिक्षा करायला इथे कायद्याने बंदी आहे. १९७९ साली त्यांनी हा कायदा केला. (आपल्या देशात २००९च्या शिक्षण हक्क कायद्याने शाळेत शारीरिक शिक्षेला मज्जाव केलाय.) लहान मुलांचा अपमान करणं, अनादर करणं या देशाला मान्य नाही. अगदी छोट्या मुलांपासून सर्वांना आदराने वागवायचं असा इथे संकेत आहे.

इथे ICA नावाची सुपरमार्केटची मोठी, प्रसिद्ध चेन आहे. दूध, दही, फळं घ्यायला तिथे गेले होते. फळांच्या सेक्शनपाशी एका टोपलीत काही केळी ठेवली होती. तिथे स्वीडिश भाषेतला एक फलक होता. भाषांतराचं app त्या फलकाजवळ नेऊन वाचल्यावर उलगडा झाला. ICA मध्ये येणाऱ्या लहान मुलांनी एकेक केळं उचलायचं आणि खायचं. फुकट. तिथे आल्या आल्या मुलांचं पोट आणि मन शांत व्हावं, म्हणून ही खास सोय. गेल्या काही दिवसांत मी अनेकदा पाहिलं, अगदी लहान मुलांसह इथे आलेले पालक इमाने-इतबारे एकेक केळं उचलतात आणि मुलांना देतात. थोडी मोठी मुलं स्वतःहून घेऊन खातात. इथले पालकही शिस्तप्रिय असावेत. कोणीही मोठी माणसं या टोपलीतलं केळं खाताना पाहिलं नाही अजून! आणि बहुतांश गुणी बालकं ते केळं खाताना दिसतात. त्यांना सवयीचं झालंय ते.

या दुकानात शिरल्या शिरल्या पहिला सेक्शन असतो कँडीजचा (Candies). कितीतरी प्रकारच्या रंगीबेरंगी, विविधांगी Candiesचे ट्रे

ठेवलेले असतात. मिट्ट गोड, आंबटगोड असे अनेक प्रकार. मनात आलं, हे बरं चालतं यांना! -पण काही पालकांशी बोलताना त्याचं उत्तर मिळालं. मुलांनी अति गोड पदार्थ जास्त खाऊ नयेत म्हणून इथले पालक एक प्रमाण ठरवतात. किती Candies घ्यायच्या, हा नियम मुलांना घालून दिलेला असतो. त्या सेक्शनमध्ये वजनकाटा असतो. त्या त्या कुटुंबाच्या नियमानुसार जास्तीत जास्त तितक्याच वजनाच्या Candies मुलं घेतात आणि पुढच्या ICA भेटीपर्यंत पुरवून खातात. त्यापेक्षा जास्त नाही म्हणजे नाही. म्हणजे आवडता खाऊ खायचं स्वातंत्र्य आणि ते प्रमाणात खाण्याची जबाबदारीही!

इथे ICA मध्ये ट्रॉलीत बसलेली किंवा ट्रॉली ढकलत पालकांच्या शेजारून चालणारी लहान मुलं- हे चित्र सर्रास दिसतं. खूप लहान वयापासून आई-वडील मुलांना दाखवत खरेदी करतात. काय घ्यावं, किती घ्यावं, पदार्थांवरचं लेबल वाचावं- हे मुलांना शिकवतात. लवकरात लवकर मुलांना स्मार्ट व जबाबदार शॉपर करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

इथे मुलांना न ओरडता, शिक्षा न करता मुलांना शिस्त कशी लावायची याच्या क्लृप्त्या पालक-शिक्षक आत्मसात करतात. स्वातंत्र्य आणि जबबदारी यांचं संतुलन पाळण्याकडे त्यांचा कल असतो. म्हणजे एखादं मूल हट्ट करू लागलं, की मला आता जेवायचं नाहीये, की आई-वडील त्यांना, वेळेत न जेवल्यावर काय होईल ते सांगतात, समजावतात. तेवढ्याने ऐकलं तर ठीक. नाही ऐकलं तर तो विषय सोडून देतात. मग भलत्या वेळी भूक लागली तर काय पर्याय असतील, हे सांगून ठेवतात. बास, विषय संपला. तीच गोष्ट अभ्यासाबाबत. मुलांनी अभ्यास केला नाही तर काय काय होईल हे वेळोवेळी सांगितलं जातं आणि परिणामांना तोंड देण्यासाठी सज्ज केलं जातं. मुळात इथली मुलं सतत शालेय अभ्यासाला जुंपलेली नसतात. वेगवेगळ्या गोष्टी शिकण्याकडे आणि त्या करून बघण्याकडे कल असतो.

स्वातंत्र्य आणि जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे आपल्याला माहीत असतं. दर १५ ऑगस्टला आपण त्याबद्दल बोलतो, लिहितो. ते व्यवहारात आणणारी काही चित्रं इथे वावरताना पाहायला मिळताहेत.

आपणही एक यादी करूया?– आपल्याला कोणकोणत्या गोष्टींना स्वातंत्र्य असल्याबद्दल छान वाटतं आणि आपण कोणकोणत्या जबाबदाऱ्या स्वतःहून पाळतो? प्रत्येकी ५-५ मुद्दे लिहिणार?

-शुभदा चौकर
cshubhada@gmail.com

स्वातंत्र्य आणि जबाबदारी

- मला या गोष्टींचं स्वातंत्र्य मिळतं- (५ मुद्दे)
- मी या जबाबदाऱ्या पार पाडते/तो- (५ मुद्दे)

निबंध नको- फक्त ५ मुद्दे लिहून पाठवा! मराठी, इंग्लिश किंवा मिंग्लिश!

पत्ता- 'वयम्' मासिक, न्यू वंदना को.ऑप.हा. सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे (प.)- ४००६०२. दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३

इमेल-ahamawamwayam@gmail.com

अंतिम तारीख- ३० ऑगस्ट २०२२

ही स्पर्धा नाही. फक्त आवाहन.

आपण एक संकलन करू या आणि सर्वांचं म्हणणं जाणून घेऊ या.

राष्ट्रीय प्रतिज्ञा कोणी लिहिली?



प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे.

माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे.

१५ ऑगस्टला झेंडावंदन करताना आपण आपली प्रतिज्ञा म्हणतो. ही प्रतिज्ञा कोणी लिहिली, माहितीये? वाचा, 'वयम्' मासिकात २०१८ मध्ये प्रसिद्ध झालेला हा लेख, आज पुन्हा! ही माहिती ज्यांनी शोधून काढली ते लेखक नरेंद्र लांजेवार यांचं फेब्रुवारीत, वयाच्या ५३व्या वर्षी दुर्दैवी निधन झालं.

मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी त्यांनी खूप काम केलं आहे. ते आपल्या 'वयम्'चे अगदी पहिल्यापासून प्रतिनिधी व चाहते होते. त्यांनी हा लेख खास आपल्यासाठी लिहिला होता. तो लेख त्यावेळी शाळाशाळांमध्ये वाचला गेला व फलकावर लावला गेला होता.

देशभरातील शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये सर्वत्र एक समान प्रतिज्ञा प्रत्येक विषयाच्या पुस्तकामध्ये सुरुवातीलाच दिलेली असते. ही प्रतिज्ञा कोणी लिहिली, कधी लिहिली, ती केव्हापासून देशातील पाठ्यपुस्तकांमध्ये आली- याची माहिती जवळपास कुणालाच दिसत नाही. मला बालपणापासून हा प्रश्न पडला होता की, आमची ही प्रतिज्ञा कोणी लिहिली असेल? कारण या प्रतिज्ञेच्या खाली कोणाचेच नाव नव्हते. मला शिकवणाऱ्या बऱ्याच शिक्षकांना मी हा प्रश्न विचारला, परंतु मला उत्तर मिळाले नाही. पुढे मी बऱ्याच विद्वान व्यक्तींशी याबाबत चर्चा केली, पण त्यांच्याकडूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. याबाबत काही संदर्भ अधिकृतरित्या मिळत नव्हते. मग मी कसून संशोधन केले, तेव्हा कुठे ही माहिती हाती लागली-

आंध्रप्रदेशातील सुप्रसिद्ध तेलगू साहित्यिक पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांनी मुळात १९६२ मध्ये तेलगू भाषेत ही प्रतिज्ञा लिहिली होती. ते आंध्रप्रदेशच्या नालगोंडा जिल्ह्यातील अन्नेपथीं गावचे राहणारे होते. संस्कृत, इंग्रजी आणि अरेबिक भाषांमध्ये पदव्युत्तर पदवीपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले होते. ते विशाखापट्टणम् या जिल्ह्याचे अनेक वर्षं 'जिल्हा कोषागार अधिकारी' म्हणून सरकारी

नोकरीत होते. त्यांच्या काही कविता, कादंबऱ्या, कथासंग्रहसुद्धा गाजले होते. मुळात राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेले, स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेले कवी पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांनी आपल्या जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी म्हणावी म्हणून एक प्रतिज्ञा १९६२ मध्ये लिहिली. त्यांच्या एका शिक्षण खात्यातील मित्राला ही कल्पना खूपच आवडली. त्याने आंध्रप्रदेशचे तत्कालीन शिक्षणमंत्री पी.व्ही.जी. राजू यांच्याकडे ही प्रतिज्ञा पाठवली. शिक्षणमंत्र्यांनी ही प्रतिज्ञा शाळांमध्ये घेण्याचा आदेश दिला. केंद्र सरकारच्या नेतृत्वात मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अंतर्गत देशातील शिक्षणखाते काम करत असते. या खात्याच्या वतीने शिक्षणामध्ये सातत्याने नवनव्या सुधारणा सुचविल्या जातात. यासाठी 'डेव्हलपमेंट ऑफ एज्युकेशन इन इंडिया' या समितीची स्थापना केलेली असते. या समितीचे अध्यक्ष केंद्रीय शिक्षणमंत्री असतात. या 'डेव्हलपमेंट ऑफ एज्युकेशन इंडिया'ची एकतिसावी मिटिंग तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री एम. सी. छागला यांच्या अध्यक्षतेखाली ११ आणि १२ ऑक्टोबर १९६४ मध्ये बंगळुरू येथे झाली होती. या मिटिंगच्या वृत्तान्तामध्ये- 'Development of Education in India: A Historical Survey of Educational Documents before and after Independence' या पुस्तकाच्या पान १४० वर मुद्दा क्रमांक १८ मध्ये उल्लेख आढळतो की, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना सदोदित राहण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये, तसेच राष्ट्रीय दिवसांच्या शुभपर्वावर विद्यार्थ्यांसाठी एक प्रतिज्ञा असावी. याकरिता पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांनी लिहिलेली 'India is my country, All Indians are my brothers and sisters' ही प्रतिज्ञा

'वयम्' मासिकाच्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनाच्या वेळी नरेंद्र लांजेवार यांचा सत्कार करण्यात आला होता. त्यावेळची ही आठवण. छायाचित्रात डावीकडून आपले प्रकाशक श्रीकांत बापट, सल्लागार कुमार केतकर, नरेंद्र लांजेवार आणि डॉ. अनिल काकोडकर

देशपातळीवर स्वीकारण्याची शिफारस करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. पुढे असेही सूचित करण्यात आले की, ही प्रतिज्ञा देशपातळीवर २६ जानेवारी १९६५ पासून सर्वत्र लागू करावी. या प्रतिज्ञेचे देशपातळीवर विविध भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले आणि १९६५ पासून देशातील सर्वच राज्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये तिचा समावेश करण्यात आला.

आपले राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान जसे रवींद्रनाथ टागोर आणि बंकिमचंद्र चटर्जी यांच्या नावे ओळखले जाते, तसेच ही राष्ट्रीय प्रतिज्ञाही पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांच्या नावाने ओळखली जावी. या प्रतिज्ञेच्या खाली त्यांचे नाव असणे गरजेचे आहे.

-नरेंद्र लांजेवार
l_narendra2001@yahoo.com

अक्षरबाप्पा..



राज कांदळगांवकर हे जगविख्यात अक्षरगणेशकार. तीन वर्ल्ड रेकॉर्ड त्यांच्या नावावर आहेत. आत्तापर्यंत २८,००० कलाकृती त्यांनी साकारल्या आहेत. लता मंगेशकर, आशा भोसले, अमिताभ बच्चन, सचिन तेंडूलकर, अण्णा हजारे, बाळासाहेब ठाकरे अशा अनेक दिग्गज मंडळींना त्यांनी त्यांच्या नावाचे अक्षरगणेश रेखाटून भेट म्हणून दिले आहेत. काहीजण त्यांच्याकडे ऑर्डर देऊनही अक्षरगणेश साकारून घेतात. हे अक्षरगणेश रेखाटताना पाहणं हा चकित करणारा अनुभव होता.

मी या राज सरांना भेटले ते त्यांच्या नेमप्लेट बनवण्याच्या छोट्याशा गाळ्यामध्ये. दरवाजावर लावण्याच्या नेमप्लेट बनवणं हे त्यांचं अर्थार्जनाचं साधन आणि 'अक्षरगणेश रेखाटन' ही त्यांची आवड आणि कला. उल्हासनगर येथे राज सरांची 'अक्षरगणेश आर्ट गॅलरी' आहे.

त्यांनी मला प्रथमेश, वरद ही गणपतीची नावं अक्षरगणेश रूपात रेखाटून दाखवली. हे करत

दरवर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'वयम्'च्या मासिकातून तुम्ही वेगवगेळ्या प्रकारच्या इको-फ्रेंडली गणपतींबद्दल वाचलं असेल. यावेळी आपण 'अक्षरगणेश' या कलेबद्दल जाणून घेऊ या.

असताना आमच्या गप्पा सुरू होत्या.

राज सर शालेय वयापासून खूपच खोडकर. शाळेत शिकताना मागच्या बेंचवर बसून मस्ती करायची, शिक्षकांचा ओरडा खायचा, शिक्षा भोगायची हा त्यांचा नित्यक्रम असे. तास सुरू असताना राज सर सतत अक्षरातून चित्र काढायचे आणि आजूबाजूच्या मुलांचं लक्ष वेधून घ्यायचे. मधली सुट्टी असेल किंवा ऑफ पिरिएड, ते काय नवीन रेखाटतात हे बघण्यात मुलांना फार कुतूहल असायचं. मात्र त्यावेळच्या त्यांच्या शिक्षकांना त्यांच्या कलेचं जराही कौतुक नव्हतं. एकदा त्यांनी राज सरांना शिक्षा केली तेव्हा राज सरांनी त्यांच्या शिक्षकांना सांगितलं की, मला अभ्यास जमत नसला तरी मी कलेच्या क्षेत्रात नाव कमावून दाखवेन. बालवयापासून राज सरांनी त्यांच्या अक्षर-रेखाटनाकडे मनापासून लक्ष दिलं आणि त्याचा सराव सुरू ठेवला. घरातील बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे रेखाटन कलेतील शास्त्रशुद्ध शिक्षण त्यांना घेता आलं नाही. पण त्यांनी त्यांचा सराव मात्र सुरू ठेवला.

कोणत्याही नावातून अक्षरगणेश

साकारण्यामागचा उद्देश त्यांनी सांगितला. 'देव' म्हणजे चांगले गुण. त्यांच्या मते प्रत्येक नावात देव आहे. वाईट गुण म्हणजे दैत्यवृत्ती. आपण जे चांगलं आहे ते घ्यावं. प्रत्येकात जे जे चांगले गुण असतात त्या गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी हा अक्षरगणेश!

अक्षरगणेश साकारण्याबरोबर राज सर अक्षरशिल्पही साकारतात. म्हणजे अक्षरशिल्पातून ते त्या व्यक्तीचं चित्र रेखाटतात. एकदा मार्कर किंवा ब्रश उचलला की ते नाव साकारल्यावरच ते खाली ठेवतात. ते इंग्रजी भाषेतूनही अक्षरगणेश साकारतात.



सोशल मिडियावर राज सरांनी साकारलेल्या अक्षरगणेशचे फोटोज आणि व्हिडिओज पाहायचे असल्यास-फेसबुकवर *RAJ KANDALGAONKAR@aksharganesh Artist* सर्च करा आणि *Instagram* वर *akshar.ganesh.kalakar* सर्च करा. तुम्हांलाही तुमचं नाव अक्षरगणेश स्वरूपात हवं असल्यास सोशल मिडियावरून त्यांच्याशी संपर्क साधा.

ते इतर भाषांतही अक्षरकला शिकत आहेत. गाण्याचा रियाज जसा रोज केला जातो, तसाच राज सरांचा सरावही रोज चालू असतो.

आमच्या या गप्पा सुरू असताना 'वयम्' मासिक बघून ते म्हणाले की, मी सर्व मुलांना हे आवर्जून सांगेन की, अभ्यासाबरोबर कलाही जोपासा. दुसऱ्याच्या कलेचा सन्मान करा. सराव करा, मेहनत करा, मग तुमच्या कलेला नक्कीच दाद मिळेल.

ज्या शाळेच्या पटांगणावर राज सरांना मस्तीखोर मुलगा म्हणून शिक्षा झाली होती, त्याच पटांगणावर २०१८ साली शाळेने त्यांचा सत्कार केला. तो दिवस त्यांना फार सुखावून गेला. लॉकडाउनमध्ये लोकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी, ते घरातून अक्षरगणेश रेखाटून दाखवत होते.

अशा कलाकारांना भेटल्यावर गणपतीचं हे गाणं सार्थ वाटतं-

'तू सकलांचा भाग्यविधाता,
तू विद्येचा स्वामी-दाता
ज्ञानदीप उजळून आमुचा
निमवी नैराश्याला...'

-क्रांती गोडबोले-पाटील
krantigodbole530@gmail.com

निसर्ग सखा

सावळे आभाळ
गहिरे मेघ
उमटली गालावर
हसरी रेघ..

उंच झाडे
हिरवीगार पाने
ओल्या मातीचे
मधूर तराणे..

विशाल पर्वत
दाट हिरवळ
मंद हवेत
फुलांचा दरवळ..

गाणारी नदी
नाचणारे पाणी
ओठावर फुलती
पाऊस गाणी..

चैतन्य सारे
भरून उरावे
रोजचे दिवस
नवेच व्हावे..

निसर्ग सखा
घालितो साद
साधू एकमेकांशी
सुखद संवाद..

-एकनाथ आव्हाड
eknathavhad23@gmail.com

खालील दोन्ही चित्रांमध्ये ११ फरक आहेत. शोधा बरं!



अय्यो

एक वेगळीच रोचक गोष्ट

वॉशिंग मशीनमधले अर्धवट ओले-कोरडे कपडे अय्योनं बादलीत काढून घेतले. चिनूच्या खोलीतल्या गॅलरीत येऊन ते कपडे ती वाळत घालू लागली.

चिनू तिथेच पलंगावर बसली होती. समोरच्या फोनवर ट्यूशन-टीचर ऑनलाइन येऊन शिकवत होत्या. कॅमेरा बंद करून, ऑडिओ चालू ठेवून चिनू नुसतं ऐकत होती, पण तिला खरंतर अतिशय कंटाळा आला होता. किती दिवस झाले, मे महिना तर कैदेतच गेला. जूनमधली शाळेच्या नव्या वर्षाची मजाही लॉकडाउनमुळे गायब झाली. नुसता ऑनलाइन ऑनलाइन अभ्यास. त्यात भरीस भर म्हणून घरातली कामं. सुरुवातीला मजा वाटली, पण नंतर मात्र... इकडची काडीही तिकडे करायची सवय नसलेल्या चिनूला लॉकडाउनचे हे चार महिने म्हणजे शिक्षा वाटू लागली होती. खाली खेळायला जायचीही बंदी. पण थँक गॉड...अय्यो आता इकडे परत आली होती. ह्या लॉकडाउनमुळे गावी अडकलेली अय्यो चार दिवसांपासून कामावर येऊ लागली आणि चिनूला हुश्श वाटलं.

अय्यो. चिनूच्या घरी मागच्या बारा वर्षांपासून काम करणारी. अगदी चिनूच्या जन्मापासून. आता ती काम करणारी नव्हे, तर त्यांच्या घरातलीच एक झाली होती. चिनूच्या इमारतीच्याच समोर लहान घरांच्या बैठ्या चाळी होत्या. त्यातल्या एका घरात एकटीच राहणारी. दिवसभर ती चिनूच्याच घरी असायची. संध्याकाळचा स्वयंपाक उरकला की, जेवूनच जायची. चिनूच्या घरातली खडा न् खडा माहिती असायची तिला. चिनूला तर तिनंच वाढवलं होतं. आई ऑफिसला गेली की, अय्योच चिनूचा सांभाळ करायची. अय्योशिवाय चिनूचं पान हलत नसे.

दीदी चिनूपेक्षा सात वर्षांनी मोठी. त्यामुळे धाकटी चिनू लहान लहान म्हणून जरा लाडावल्यासारखी. धाकटी असूनही तिचा घरात दरारा. आबासुद्धा चिनूचंच ऐकायचे. गमतीनं तिला बॉस म्हणायचे.

ट्यूशन-टीचरचं आजचं ऑनलाइन लेक्चर संपलं आणि चिनूनं फोन बंद केला. ट्यूशन-टीचरनं हिस्ट्रीचा दुसरा लेसन संपवला होता. हडप्पा आणि मोहेंजोदडो... इंडस व्हॅली सिव्हिलायझेशन... सिंधूनदीच्या काठावरची हजारो वर्षांपूर्वीची संस्कृती.

'बापरे, केवढं काय काय होतं आपल्या देशात हजार वर्षांपूर्वी. किती मोठी शहरं होती बांधलेली. किती हुशार माणसं होती ही. पण अशी ही शहरं जमिनीच्या पोटात गुडूप झाली. हजार वर्षांनंतर शोधून काढलं त्यांना. पण कसं काय शोधून काढलं असेल हा अभ्यास करणाऱ्या लोकांनी हे सगळं हजार वर्षांपूर्वीचं. खरंच असं असेल का?'

विचार करता करता चिनूच्या डोळ्यांवर पेंग येऊ लागली होती. गॅलरीत कपडे वाळत घालणाऱ्या अय्योकडे तिचं लक्ष गेलं. चिनूचेच कपडे ती वाळत घालत होती. बारीक अंगाची, पण उंच दिसणारी, केसांचा बुचडा बांधलेली अय्यो. तिच्याकडे बघता बघता चिनूला वाटलं- अरे, ही तर त्या हडप्पा सिव्हिलायझेशनमधल्या त्या चित्रातल्या बाईसारखीच दिसतेय की.. डिट्टो. ही अशी मॉडेल म्हणून उभी राह्यली तर? आपल्या विचारांचं चिनूला

चित्र- अदिती पाध्ये-देसाई

खूप हसू आलं. रात्री गप्पा मारताना तिनं ते दीदीला सांगितलं. दीदी म्हणाली, "चिनू, ह्या लॉकडाउनमुळे तुझं डोकं ना विचित्र विचारांचं खोकं झालंय... पण आत्ता तुला सुचलेली आयडिया छानै हां." .....

"अय्यो, अगं तेवढं वेळेचं लक्षात ठेव गं." दीदी बाहेर जाता जाता म्हणाली. "व्हय दीदी, कशी इसरीन? पक्कं लक्षात हाय." अय्यो म्हणाली आणि केरसुणी घेऊन चिनूच्या खोलीतला केर काढू लागली.

'अय्यो... हिचं खरं नाव काय असेल? हे विचारायचं आपल्या कधी लक्षातच आलं नाही. आपलं कसं चिन्मयी, पण घरात लाडाची चिनू. तशी ही अय्यो असेल तर हिचं खरं नाव?' चिनू पलंगावर पटकन उठून बसली. तिनं अय्योला हाक मारली,

"अय्यो..."

केर काढता काढता अय्योनं विचारलं, "काय गं चिनू?"

"अय्यो, तुझं खरं नाव काये गं?"

अय्यो एकदम थांबली आणि हसू लागली.

"हे काय आज भलताच? माजं नाव म्हाईत नाय का तुला? माजं नाव अय्यो... इतकाली वरसं जाली. आज का इचारतेस? बर्र... सात वाजलेत. चाल्ले मी. आटापली कामं. आज उपवास माजा. जेवायचं नाय माला. तुला काय खायला हवा काय? आईबाबांना उशीर होणारे. आबा जेवले. दीदीचं डायट-फायट, ती गेलीय बाहीर. तुजं सांग."

"अगं, मला काही भूक नाहीये. मी घेईन काही लागलं तर. जा तू."

चिनू एवढं बोलताच अय्यो लगालगा केर सारत निघून गेली. चिनूच्या लक्षात आलं, हिनं आपल्या प्रश्नाला मस्त बगल दिली की. अय्यो गेली आणि चिनू पुन्हा तशीच पलंगावर लोळू लागली. थोडा वेळ तिनं हिस्ट्रीचा सिंधू संस्कृतीवरचा धडा वाचला.

होमवर्क पूर्ण केला. मग जरा कंटाळा आला तिला. तेवढ्यात तिच्या डोक्यात काहीतरी लकाकलं. ती पटकन पलंगावरून उठली आणि आजोबांना हाक मारत म्हणाली, "आले हो आजोबा मी दहा-पंधरा मिनिटांत परत. जरा खाली जाऊन येते."

"ओके... मास्क घालून जाऽऽ." आजोबा म्हणाले.

चिनू खाली आली खरी, पण खाली खेळणाऱ्या मित्र-मैत्रिणींकडे न वळता गेटमधून बाहेर पडली. समोरची गल्ली ओलांडून पलीकडच्या बैठ्या घरांच्या चाळीत शिरली. त्या चाळीत दोन्ही बाजूला लहानलहान घरं आणि मधून जाणारी चिंचोळी वाट होती. जेमतेम दोन माणसं एकत्र चालू शकतील इतकीच.

सगळ्यांची दारं उघडी होती. चिनूला आश्चर्य वाटलं. एका घरातून भाकरी भाजल्याचा वास येत होता, तर दुसऱ्या घरातून खमंग फोडणीचा. एका घरातून टिव्हीवरच्या बातम्यांचा आवाज येत होता, एका घरातून टिव्हीवरच्या मराठी मालिकेचा.

तेवढ्यात कुत्र्याचं एक लहानसं पिल्लू शेपूट हलवत तिच्या मागेमागे आलं.

'अरे हा तर टिंक्या. मुक्ताकडचं पिल्लू.' स्वतःशीच पुटपुटत चिनूनं टिंक्याला उचललं.

मुक्ता...अय्योच्या बहिणीची मुलगी. चिनूएवढीच. तिची लहानपणापासूनची मैत्रीण. १० नंबरचं घर अय्योचं. चिनूनं टिंक्याला चुचकारत खाली सोडलं. तो उड्या मारत निघून गेला. अय्योच्या घराचं दार लोटलेलं होतं. दाराजवळची खिडकी बंद होती. चिनूनं हळूच दार ढकललं आणि ती अय्योला हाक मारणार... इतक्यात... समोरचं दृश्य पाहून चिनू एकाच जागी खिळून उभी राहिली.

अय्योचं घर एकदम वेगळंच दिसत होतं. थोडं अंधारलेलं. दोन कोपऱ्यात मातीच्या दोन मोठ्या पणत्या तेवत होत्या. जुन्या दगडाचं ते घर थंडगार वाटत होतं. त्यातल्या वस्तूही वेगळ्याच. जुन्या पण नक्षीदार. एका कोपऱ्यात मातीची भांडी, चूल.

'अरेच्चा, चूल? अय्योकडची गॅसशेगडी कुठे गेली?' चिनू स्वतःशीच पुटपुटली. तेवढ्यात त्या घराच्या मागच्या दारातून एक आकृती पुढे आली. तिच्या हातात एक पणती होती. चिनू थोडी घाबरली. ती आकृती पुढे झाली. तिनं ती पणती भिंतीतल्या कोनाड्यात ठेवली. त्या आकृतीच्या चेहऱ्यावर प्रकाश पसरला.

'ओहो...' चिनू ओरडली. "अगं अय्यो? तू? तू अशी वेगळी का दिसतेयंस? आणि तुझं घरही?"

अय्यो काहीच न बोलता उभी होती. कंबरेवर हात ठेवून. चिनू बघतच बसली. 'डिट्टो तशीच दिसतेय की ही. हडप्पा-मोहेंजोदडोमधल्या बाईसारखी. तश्शीच बारीक, उंच, हसरी. केसांची बुचड्यासारखी हेअरस्टाइल केलेली. गळ्यात कितीतरी माळा. सोन्याच्या, मण्यांच्या. किती सुंदर दिसतेय अय्यो. हजारो वर्षांपूर्वी आपल्या सिंधू संस्कृतीमधल्या बायका अशाच दिसायच्या आणि राहायच्या. म्हणजे अय्यो त्यांच्यातली? मग मी? मी कुठली?'

अय्यो हसत म्हणाली, "तूबी इथलीच, बायो."

मग अय्योनं कोपऱ्यातली एक मोठी, नक्षीदार पेटी उघडली. त्यामध्ये कपडे नि दागिने होते. तिनं ते चिनूला घातले. तिचे केस बांधले. समोरच्या मोठ्या लाकडी गोलात एक जुना आरसा होता. त्यात चिनूनं स्वतःला पाहिलं. 'ओहो, आपणही अय्योसारखे दिसतोय की. जुन्या स्टाइलसारख्या. मस्तच वाटतंय. पण हे सगळं अय्योकडे कसं?' अय्यो तिच्या मागेच उभी होती. चिनू आणि अय्यो दोघी सारख्याच दिसत होत्या. एका लहान आकृतीची एक मोठी प्रतिकृती.

अय्योनं चिनूच्या खांद्यावर प्रेमानं हात ठेवला. चिनू म्हणाली, "अय्यो, आपण दोघी एकमेकींसारख्याच आहोत की हजार वर्षांपूर्वीपासून. तू अय्यो, तर मी बायो." दोघींना खूप हसायला आलं.

"पण अय्यो, मला एक सांग, तुझ्या घरात ह्या सगळ्या जुन्या वस्तू आल्या कुठून? आणि हे कॉस्च्युम... आय मीन कपडे?"

अय्यो गोड हसली आणि तिच्यामागे एक मोठ्ठा गोल दिवा प्रकाशला. स्टँडवरचा गोल दिवा. त्या दिव्याच्या मागून कुणीतरी पुढे आलं. अंधारात डोळ्यांसमोर अचानक प्रकाश आल्यामुळे चिनू डोळे चोळायला लागली. डोळे उघडून बघते तर काय... 'दीदी ? हो दीदीच आहे की ही...'

चिनूची दीदी आणि तिचे तीन-चार मित्रमैत्रिणी मिळून त्यांच्या अभ्यासाचा एक भाग म्हणून एक शॉर्ट फिल्म बनवत होते. त्या शॉर्ट फिल्मची हिरॉइन होती, अय्यो!

रात्री सगळे जण गप्पा मारायला बसले तेव्हा दीदी म्हणाली, "चिनू, तुला आठवतं, काही दिवसांपूर्वी तू सहज बोलून गेलीस की, अय्यो त्या हडाप्पामधल्या बाईसारखी दिसते. त्याच वेळी ह्या शॉर्टफिल्मचा विषय माझ्या डोक्यात क्लिक झाला. 'हजारो वर्षांपूर्वीची सिंधू' आणि हिरॉइन पक्की झाली... आपली अय्यो. मग आमच्या ग्रुपनं काम करायला सुरुवात केली. जरा गुपचूप. असंच सरप्राइज. काम पूर्ण होतंच आलंय. आम्ही सांगणारच होतो. आज तू अचानक आल्यामुळे आमचं सरप्राइज जरा लवकर फुटलं. पण नो प्रॉब्लेम. खरंतर क्रेडिट गोज टू यू ओन्ली, डिअर."

दीदीनं चिनूला प्रेमानं जवळ घेतलं. अय्योसुद्धा कमरेवर हात ठेवून खुदूखुदू हसत होती.

चिनूला वाटलं, 'अय्यो, मी, दीदी... आम्ही सगळ्याच हजारो वर्षांपासून अशा कमरेवर हात ठेवून, सिंधू नदीच्या काठावर उभ्या आहोत... ठामपणे.'

-डॉ. निर्मोही फडके
nirmohiphadke@gmail.com
(कथाकार)

खालील शब्द किती बोलके आहेत बघा! त्या त्या शब्दाचा अर्थ आणि भाव व्यक्त होईल, अशा रीतीने लिहिले आहेत. सुनील धोपावकर हे जाहिरात क्षेत्रातील नामवंत कलाकार आहेत. तुम्हीही त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन असे काही शब्द चितारून बघा. ते तुमच्या मनासारखे उमटले, तर आम्हांलाही पाठवा पाहायला!

हिमती मुलांच्या कहाण्या


कलाशिक्षिका फ्रीडल

इतिहासातील राजे, राजवटी, राज्यप्राप्तीसाठी होणारी युद्धं या गोष्टी तुम्ही ऐकल्या, वाचल्या असतील, कधीतरी त्यावर आधारित चित्रपटही पाहिले असतील. आपल्याला या गोष्टी वाचताना, पाहताना मजा वाटते, पण जिथे प्रत्यक्ष युद्धं होतात, तिथल्या लोकांना खूप त्रास सोसावा लागतो. अशा स्थितीत लहान मुलं तर फारच घाबरतात. पूर्वी युरोपमध्ये दोन महायुद्धं झाली. त्यात जर्मनीचा तेव्हाचा सत्ताधीश हिटलर याने क्रूरपणे अनेकांना ठार मारलं. त्यात विशेषतः ज्यू धर्मातील लोकांना वेगवेगळ्या ठिकाणी छळछावण्यांमध्ये ठेवण्यात आलं होतं. अत्यंत अमानुष कृत्य होतं ते!

यात अनेक मुलंही होती. त्या ज्यूधर्मीय मुलांना शाळेत जायचं होतं, अभ्यास करायचा होता, मित्रांबरोबर मजाही करायची होती. पण त्यांना असं कैदेत ठेवल्याने त्यांचे सारे बेत मनातच राहिले. त्यांना कोणाबरोबर बोलता येत नव्हतं, कुणाशी मस्ती करता येत नव्हती. त्यांचे आईवडील त्यांच्यापासून खूप दूर वेगळ्या तुरुंगात होते. मुलं कासावीस होत होती. त्यांना आपल्या घराच्या, कुटुंबीयांच्या, शेताच्या, बागेच्या, शाळेच्या आठवणी येत होत्या. पण काय करणार? अनेक लहान मुलानांही तुरुंगात असताना न झेपणारी कामं करावी लागत होती. जर कामचुकारपणा केला तर असह्य मार देत असत, भयंकर शिक्षा देत असत; उपासमार तर होतच असे.

अशा परिस्थितीत झेकोस्लोव्हाकियातील एका छळछावणीतील मुलांच्या मदतीला आली ती त्यांची शिक्षिका. तिचं नाव फ्रीडल ब्रॅन्डाईस. ती कलाशिक्षिका होती. तिने ही घाबरलेली मुलं सांभाळली. वेगवेगळ्या वयाच्या मुलांना ती गोष्टी सांगे, धीर देई. भीतीमुळे ही मुलं काहीच बोलत नसत, आपल्या मनातील सगळ्या गोष्टी ते मनातच दाबून ठेवत. पण फ्रीडल टीचरने त्यांना हळूहळू चित्रं काढायला शिकवलं. त्यातून त्यांच्या मनातल्या भावना व्यक्त होऊ लागल्या. त्यांच्या मनात आपल्या घराच्या, शेताच्या, आपली मनीमाऊ, आपला कुत्रा, गायी यांसारख्या पाळीव प्राण्यांच्या ज्या आठवणी होत्या, त्या ती मुले हळूहळू चित्रातून रंगवू लागली, आपल्या टीचरशी थोडं का होईना, बोलू लागली. या परिस्थितीबद्दलची भीती बाहेर पडल्याने ती मुलं काहीतरी प्रतिसाद देऊ लागली. कुणी आपल्या मनातला सूर्योदय रंगवला, कुणी

आपल्या 'वयम्'च्या अंकात तुम्ही वाचलंत की 'युक्रेन-रशिया युद्ध का झालं?' जगभरात कुठे कुठे संघर्ष सुरू आहे आणि त्याच्या यातना मुलांना भोगाव्या लागत आहेत, याबद्दलचा सुचिता देशपांडे यांचा लेखही तुम्ही जूनच्या अंकात वाचलात. याच लेखिकेने प्रत्यक्ष इस्रायलमध्ये जाऊन तिथल्या मुलांनी छळछवणीत राहताना काढलेली चित्रं व कविता पाहिल्या. छळछावणीतील मुलांनी त्या परिस्थितीशी कसा सामना केला असेल?

फुलं काढली, कुणी लहान भावंडांच्या भावमुद्रा रंगवायचा प्रयत्न केला. अशाने त्यांच्या आजूबाजूला जे सारं नैराश्य पसरलं होतं ते दूर होऊ लागलं, मुलांना उत्साह वाटू लागला. आपल्या टीचरच्या प्रेमळ वागणुकीमुळे त्या मुलांच्या मनात जगण्याची आशा निर्माण झाली.

फ्रीडल टीचरने ही सारी चित्रं तेव्हा नीट जपून ठेवली. आता ज्यू लोकांच्या देशात, इस्रायलमधल्या म्युझियममध्ये ही आशादायी चित्रं जपून ठेवली आहेत. मुंबईतील सुचिता देशपांडे नावाच्या पत्रकार, लेखिकेने प्रत्यक्ष इस्रायलमध्ये, जेरुसलेमला जाऊन तिथली ही चित्रं पाहिली. त्या मुलांनी छळछवणीत राहताना केलेल्या कविताही वाचल्या. आपल्याला त्याविषयी सांगण्यासाठी त्या चित्रांचं आणि त्या मुलांची गोष्ट सांगणारं पुस्तक त्यांनी प्रकाशित केलंय. त्याचं नाव आहे 'काळोखातील प्रकाशरेषा'. तुम्ही हे पुस्तक, त्या मुलांच्या चित्रांसाठी, फ्रीडल टीचरच्या गोष्टींसाठी वाचायला हवं. अत्यंत कठीण परिस्थितीतही जगण्याची प्रेरणा तुम्हांला त्यातून नक्की मिळेल.

'काळोखातील प्रकाशरेषा' या पुस्तकातून तुम्ही ज्या मुलांची चित्रं पाहाल, कविता वाचाल, फ्रीडल टीचरने मुलांसाठी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल वाचाल, त्याच फ्रीडल टीचरच्या तळघरातील वर्गात एक मुलगी होती, झेकोस्लोव्हाकियातील हॅना ब्रॅडी.

या हॅनाची कहाणी निराळीच. तिला जेव्हा



घरातून छळछावणीत नेलं गेलं तेव्हा तिला जुजबी सामान घेण्यासाठी एक सूटकेस नेण्याची परवानगी मिळाली. त्यावर तिचं नाव आणि जन्मतारीख घातली गेली. तुरुंगात गेल्यावर तोवर अगदी हसरी-खेळकर असणारी हॅना रडवेली झाली, आपल्या आईवडिलांच्या, भावाच्या आठवणीने व्याकूळ झाली. तिथे तिला अतिशय हालात दिवस काढावे लागले. खायला पुरेसं नाही, वय लहान, बरोबर आलेल्या भावाला मुलांच्या तुरुंगात राहावं लागल्याने तिला फारच एकटं वाटे. एका वर्षानंतर

तिथल्या मुलींना आणखी वेगळ्या ठिकाणी जावं लागलं. ते ठिकाण या तेरेझिनपेक्षा अधिक भयानक होतं. तिथे गेलेला कुणीच जिवंतपणे परत येऊ शकत नसे. हॅनाचंही असंच झालं.

मात्र फ्रीडल टीचरच्या प्रोत्साहनाने तिने काढलेली चित्रं टीचरने जपून ठेवली होती. युद्ध संपलं. युद्धात जर्मनीचा पराभव झाला. खूप माणसं मारली गेली. युद्धाचे भयंकर परिणाम सगळ्या जगाला भोगावे लागले. जगभर शांतता राखण्यासाठी प्रयत्न होत होते, आताही होतात. जपानमध्ये या युद्धातील भीषण परिणामांविषयी मुलांना सांगितलं जातं. जी मुलं यात सापडली, मारली गेली, त्यांची आठवण आताच्या मुलांना करून देण्यासाठी एक म्युझियम उभारण्यात आलंय. त्या म्युझियममध्ये एक दिवस या हॅना ब्रॅडीची रिकामी सूटकेस ठेवली गेली. तेथील मुलांना त्याविषयी खूप वाईट तर वाटलंच, पण ती कोण होती हे शोधून काढावं म्हणून त्या मुलांनी पुन्हा आपल्या टीचरला- फुमिको इशियाको- हिला गळ घातली. तिने सगळीकडे त्यासाठी खूप शोध घेतला. शेवटी हॅनाचा भाऊ जॉर्ज कॅनडात आहे, असं कळलं आणि मग हॅनाची सगळी कथा पुढे आली. कॅरेन लेवीन या कॅनेडियन पत्रकार-लेखिकेने हॅनाच्या सूटकेसचा शोध कसा घेतला, ती सूटकेस जपानमध्ये कशी पोचली यावर आधारित हॅनाज सूटकेस (Hana's Suitcase) या नावाचं पुस्तक लिहिलं.. ते जगभर अनेक भाषांमध्ये वाचलं जातं. मराठीतही ज्योत्स्ना प्रकाशनाने हे पुस्तक (हॅनाची सूटकेस– अनुवाद माधुरी पुरंदरे) या नावाने प्रसिद्ध केलंय.

महायुद्धांच्या काळात मुलांना आपापल्या मनातील आठवणी, लहानमोठे विचार, येणारी निराशा, मनातली भीती, दडपण कुणाजवळ बोलता येत नव्हतं. त्यामुळे डायरीच्या माध्यमातून अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत..

नेदरलँडस् या देशात त्या काळात फ्रँक नावाचं एक ज्यू कुटुंब एका तळघरात लपून बसलं होतं. आईवडील आणि दोघी मुली. त्यातली ॲन लहान होती, पण तिला वाचनाचा नाद होता. तिच्या बाराव्या वाढदिवसाला तिच्या मैत्रिणीने तिला एक सुरेख डायरी भेट दिली होती. तिला ती फारच आवडली. ज्यूंना मारलं जात असताना, तिच्या आईवडिलांनी दोन्ही मुलींना बरोबर घेत अगदी आवश्यक तेवढं सामान घेतलं आणि ते लपण्यासाठी एका तळघरात गेले. आपल्या सामानात ॲनने ती डायरीही घेतली होती. तिथे गेल्यावर बाहेरच्या जगाशी पूर्णपणे संबंध सुटला. ती फारच एकटी पडली. कोणाशी बोलणार? कोणाबरोबर खेळणार? शाळा बंद. मैत्रिणी भेटत नव्हत्या. मग तिने एक युक्ती केली. त्या डायरीलाच तिनं आपली मैत्रीण बनवलं. तिचं नाव ॲनने 'किटी' असं ठेवलं. मग रोज ती त्या डायरीशीच आपल्या मनातल्या साऱ्या गोष्टी बोलू लागली. कधी ती तिच्यावर रागवे, तर

कधी मनातल्या वेगवेगळ्या कल्पना सांगे. आपली स्वप्नं सांगे. मोठं झाल्यावर आपण लेखिका व्हायचं असं तिचं स्वप्न होतं.

तळघरातून पकडली गेल्यावर तिचीही रवानगी छळछावणीत झाली; तिथे तिचे अतोनात हाल झाले. तरीही विशेष म्हणजे तिचा लोकांच्या चांगुलपणावरचा विश्वास उडाला नाही. सारं जग किती सुंदर आहे, असंच ती शेवटपर्यंत मानत होती. कोणत्याही परिस्थितीत हार मानायची नाही, आणि आशा सोडायची नाही, हा तिचा दृढनिश्चय तिला अमर करून गेला. तिच्या मृत्यूनंतर तिची डायरी प्रकाशित झाली. आजवर लक्षावधी मुलांनी ती डायरी वाचली आहे. अनेक मुलांना त्यातून प्रेरणा मिळाली आहे. 'द डायरी ऑफ अ यंग गर्ल' या एका पुस्तकामुळे ॲन फ्रँक जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोचली. याही पुस्तकाचा 'डायरी ऑफ ॲन फ्रँक' या नावाने मंगला निगुडकर यांनी केलेला अनुवाद मेहता प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे.

यासारखी पुस्तकं आपल्याला अनेक गोष्टींची माहिती करून देतात. लहानगी मुलंही वेळ आली, की किती चिवटपणे संघर्ष करतात, अचानक मोठ्या माणसांसारखी शहाणी होतात, कठीण प्रसंगाला निर्भयपणे तोंड देतात, हे पाहून आपल्यालाही संकटं पार करण्याची उमेद मिळते.

-डॉ. मीना वैशंपायन
meenaulhas@gmail.com
(ज्येष्ठ साहित्यिक)

कल्पकला

पुस्तकांना कव्हर

साहित्य- जाडसर कागद, स्केचपेन्स, एक बटाटा, पोस्टर कलर / ॲक्रेलिक कलर.

कृती- बटाटा मधून कापून दोन तुकडे करा. कापलेल्या भागावर पोस्टर कलर /ॲक्रेलिक कलर, ब्रशने लावून, त्याचे ठसे कागदावर उमटवा. बटाट्याच्या रंग लावलेल्या बाजूकडून प्रत्येकी एक अशा चकत्या कापून, कापलेल्या नवीन पृष्ठभागावर ब्रशने पुन्हा रंग लावून,त्याचे ठसे कागदावर उमटवा. अशाप्रकारे एका बटाट्यापासून निरनिराळ्या रंगांचे आणि आकाराचे गोल कागदावर उमटतील. (अशाप्रकारे कांद्याचे, भेंडीचे वगैरे भाज्यांचे ठसे कागदावर उमटवता येतील.) कागदावरचा रंग संपूर्णपणे सुकल्यावर, स्केचपेनने त्यावर चित्र/नक्षी काढा.

आणि ह्या तयार झालेल्या छानशा कागदाने तुमच्या पुस्तकांना कव्हर घाला.

-स्वरूपा वक्नाली
swarupamv@gmail.com

आपल्या घरातल्या मदतनीसांना लळा लावल्यावर आणि त्यांच्याविषयी जिव्हाळा व्यक्त केल्यानंतर मिळणारा आनंद काही वेगळाच असतो...

चित्र- आर्किस टिळवे

जिव्हाळ्याचे बंध

रविवार होता. सकाळी उठल्या उठल्या ऋग्वेदच्या नाकात सांबाराचा खमंग वास शिरला. तो टुणकन उठून स्वयंपाकघराकडे धावतच गेला. पांढऱ्याशुभ्र लुसलुशीत इडल्या, कोथिंबिरीची हिरवीगार चटणी आणि खळखळून उकळणारं लाल-लाल सांबार! अहाहा!

दात कधी घासतो आणि कधी इडली खातो, असं त्याला झालं होतं.

एरवी ऋग्वेद सकाळी खायचा कंटाळा करत असे. आईने त्याला चिडवायला मुद्दामच म्हटलं, "भूक नसेल ना रे? मी आणि बाबा खाऊन घेतो. तू घे सावकाश, भूक लागली की!"

ऋग्वेद उत्तरला, "नाही, नाही! येतोय मी पटकन दात घासून!"

गप्पाटप्पा करत निवांत खाणं उरकलं. बाबाने आणि ऋग्वेदने भांडी ओट्यावर आणून ठेवायला सुरुवात केली. ऋग्वेदचं लक्ष तिथे असलेल्या डब्यांकडे गेलं. सहज त्याने ते डबे उघडून बघितले तर त्यात ८-१० इडल्या, चटणी आणि सांबार भरून ठेवलं होतं. आज तर रविवार! आईने चुकून ऑफिससाठी डबा भरला की काय? असा विचार त्याच्या मनात आला.

"आई.. अगं तू चुकून डबा भरलायस का?" त्याने विचारलं.

आई आत येता येता म्हणाली, "अरे, गीतामावशींच्या मनाली आणि राजेशला पण इडल्या खूप आवडतात ना, म्हणून काढून ठेवल्या आहेत."

ऋग्वेदने मान हलवली आणि तो पुढचं आवरायला निघून गेला. आई दिवाळीतसुद्धा त्या दोघांसाठी कपडे-खाऊ पाठवते. घरात काही पूजा वगैरे असेल तरी या दोघांना आमंत्रण असतं आणि आपल्या मित्रमैत्रिणींमध्ये हे दोघेही असतात हे ऋग्वेदला आठवलं...

...या गोष्टीला ८-१० वर्षं झाली. असाच रविवार होता. आईने रविवार स्पेशल थालीपीठं केली होती आणि दारावरची बेल वाजली. ऋग्वेदने दार उघडलं. गीतामावशींचा राजेश होता. त्याच्या हातात

दोन-तीन पिशव्या आणि पेढ्यांचा पुडा होता. दार उघडताच ऋग्वेदने राजेशच्या पाठीवर थाप मारली आणि दोघंही नव्या पिढीच्या शिरस्त्याप्रमाणे अगदी उराउरी भेटले. आई हात पुसत बाहेर आल्यावर राजेशने पेढ्याचा पुडा आईच्या हातात ठेवला आणि वाकून नमस्कार केला. त्याला नोकरी लागल्याचेही सांगितले. आई-बाबा आणि ऋग्वेदसाठी आणलेल्या भेटवस्तू त्याने तिघांना दिल्या.

"अरे, एवढं कशाला?" असं आईने म्हणताच खरंतर अबोल असलेला राजेश बोलू लागला,

"मावशी, लहानपणापासून आईशी किंवा आमच्याशी कामवाली आणि कामवालीची मुलं असं तुम्ही किंवा या घरातलं कोणीच वागलं नाही. बाकीच्या घरातून पगार मिळायचा. पण या घरातून पगाराबरोबर प्रेम आणि आदरही मिळत होता. म्हणूनच पहिल्या पगारातून मनाली आणि आईसाठी भेटवस्तू घेतल्या, तशाच तुमच्यासाठीही घ्याव्याशा वाटल्या. मला आता छान नोकरी मिळाली आहे. मी आईला सांगितलं की आता तू काम करू नकोस. दमते ती हल्ली! तेव्हा आईने ठणकावून सांगितलंय की, ती तिचे हातपाय चालतायत तोपर्यंत हे काम करणारच. मी नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. कारण हे तिचं फक्त कामाचं ठिकाण नाही तर विसाव्याचं स्थान आहे."

आईच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. तिने हलकेच राजेशला थोपटलं. बाबांनीही त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. ऋग्वेदनेही पुढे येऊन राजेशला शुभेच्छा दिल्या. मनाशी खूणगाठ बांधली, की आईचा नाती निर्माण करण्याचा आणि जपण्याचा वसा आपण नक्की पुढे चालवायचा!

-कांचन जोशी
kanchanpjoshi76@gmail.com
(संस्कृत अभ्यासक)

पाऊसकाळ...

झर झर झरले काळे मेघ
इंद्रधनूची रंगीत रेघ

डब डब लहान भरले तळे
बेडूक दादा काढी गळे

पिवळे कोवळे पडले ऊन
पाखरांमुखी चिव चिव धून

लूस लूस हिरवे उगले रोप
रानफुलांचे घालून टोप

दल दल झाली चहुंकडे
ओलेच ओले डोंगरकडे

आला आला पाऊसकाळ
ग्वाही त्याची रानोमाळ

-भानुदास धोत्रे
bhanudasdhotre2015@gmail.com

'वयम्' मासिकामध्ये शीर्षक सुलेखन करणारे सुप्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांनी 'पाऊस' या शब्दाचं केलेलं हे अप्रतिम सुलेखन.

अँटिनावालं कासव

तुम्हांला कासवं आवडतात ना? आपण एकतरी कासव पाळू या, त्याला खायला घालू या, समुद्रात लुटूलुटू करत जाणारी कासवांची पिल्लं बघायला जाऊ या, असं नक्कीच तुमच्या मनात येत असेल. मलाही कासवं आवडतात. मी कासवांवर लघुपट बनवला आहे. माझ्या गोष्टीतलं हे कासव आहे, 'अँटिनावालं कासव.'

ऑलिव्ह रिडले कासवं जानेवारी ते एप्रिल या काळात अंडी घालण्यासाठी कोकणच्या किनाऱ्यावर येतात. या कासवांनी किनाऱ्यावर अंडी घातली की ती लगेच निघून जातात. मग दीड महिन्यांनी कासवांच्या घरट्यातून पिल्लं बाहेर येतात आणि ती कुणाच्याही मदतीशिवाय समुद्रात निघून जातात.

ही कासवं एकदा समुद्रात गेली की मग ती काय करतात, कुठे जातात, किती खोलवर जातात, याबद्दल आपल्याला फारसं काही माहीत नसतं. मग या कासवांचा अभ्यास तरी कसा करायचा?

यावर संशोधकांनी एक शक्कल लढवली; ही कासवं जेव्हा अंडी घालण्यासाठी किनाऱ्यावर येतात, तेव्हा त्यांना सॅटेलाइट ट्रान्समीटर लावण्याची. कासवांना असा ट्रान्समीटर बसवला की, मग ती समुद्रात जिथे जिथे प्रवास करतात तिथून सॅटेलाइटच्या द्वारे आपल्याला सिग्नल मिळू शकतो. कोकणच्या किनाऱ्यावर आलेल्या पाच कासवांना असे ट्रान्समीटर बसवण्यात आले आणि वन्यजीव संशोधक डॉ. आर. सुरेशकुमार यांनी त्यांच्या प्रवासाची रहस्यं शोधून काढली.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागरमध्ये जेव्हा ऑलिव्ह रिडले कासवांना असे ट्रान्समीटर बसवण्यात आले, तेव्हा मी त्याचं चित्रण केलं. या पाच कासवांनी आतापर्यंत समुद्रात कुठेकुठे प्रवास केला आहे हे तुम्हांला या लघुपटात पाहायला मिळेल. जंगलांसाठी जसा वाघ महत्त्वाचा, तसं समुद्राच्या पर्यावरणासाठी कासवं कशी महत्त्वाची आहेत, हेसुद्धा मी यात सांगितलं आहे.

ऑलिव्ह रिडले कासवं मच्छिमारांच्या जाळ्यात अडकून मरण्याच्या घटना घडतात, पण आता मच्छिमार बांधवांमध्येही या कासवांच्या संवर्धनाबद्दल जागृती झाली आहे. त्यांच्या जाळ्यात जर कासव अडकलं तर ते त्याची सुटका कशी करतात, याची गोष्ट तुम्हांला यात पाहायला मिळेल.

'अँटिनावालं कासव' हा लघुपट तुम्हांला 'shekru' या माझ्या You tube channel वर पाहायला मिळेल. शेकरू हा आपल्या महाराष्ट्र राज्याचा राज्य-प्राणी आहे. म्हणूनच मी माझ्या You tube channel ला 'shekru' हे नाव दिलं आहे. शेकरू म्हणजे मोठी खार. पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये माझा आणि तुमचा मोठ्या खारीचा वाटा असावा, म्हणून ही सारी धडपड. सुगरणींची घरटी, ब्लॅंक पँथरची रहस्यकथा, कोकणातल्या पायरहाटाची गोष्ट, या माझ्या निसर्गगोष्टीही बघा आणि तुमच्या मित्र-मैत्रिणींपर्यंत पोहोचवा.

लिंक- https://youtube.com/channel/UCV1KzBn7j1sJJf5YXFe4Tgg

-आरती कुलकर्णी
aratikulkarni@gmail.com
(पर्यावरण पत्रकार)

पाऊस पाणी



आभाळाचा ढोलताशा
बेडकांची गाणी
पावसाचं पाणी बाई
पावसाचं पाणी

टम्म भरला ढग
गळतो एकाएकी
लावतो उधळून
सारी झाकाझाकी
होते थंड हवा
माती होते लोणी

वाफ होऊन जाण्याची
गोष्ट सांगतात सारे
पावसाआधी वाहतात म्हणे
सोसाट्याचे वारे
येतं कसं? जातं कुठे?
पाहिलंय का कोणी..

आहे जरा घुमक्कड
उताराला वाहतं
वाऱ्यासंगे झोके घेत
आभाळभर होतं
छत्री नाही, रेनकोट नाही
पाय अनवाणी

नदी, तळं, समुद्राचं
कधी होतं गटाराचं
कधी गरम, कधी थंड
कधी गोड शहाळ्याचं
असेल जसे कथानक
तशी बदलते कहाणी

रिमझिम तालामध्ये
थेंबुटांची नाणी
थेंब होई कोंब कोंब
टप टप कानोकानी
चिंब ओल्या अंगणाचं
गाव आबादानी

-दासू वैद्य
dasoovaidya@gmail.com

भिंतीची नहान

'हे काय असे भिंतीला पाणी घालतात? भिंत म्हणजे काय बाग आहे का? की भिंतींच्या आत झाडं आहेत?' ... अन्वयचे प्रश्न आणि आजी-आज्जोंची उत्तरं- वाचा ही विज्ञान-गोष्ट!

अन्वय घरी आला तो मोठ्या खुशीतच. दोन्ही हात उंचावत अन्वय म्हणाला, "आता आमची शाळा मोठी होणार. एकदम मोठी होणार! म्हणजे उंच होणार."

"आँऽऽ? मोठी होणार की उंच होणार? आणि हे तुला कसं काय कळलं?" भुवया उंचावत आज्जोंनी विचारलं."

"आमच्या शाळेच्या वरती एक नवीन मजला बांधत आहेत. एका रांगेत १२ वर्ग आहेत. आणि आज आमच्या ताई आम्हांला तिथे घेऊन गेल्या होत्या..."

"तुम्ही कशाला तिकडे गेलात? तिकडे सगळा राडारोडा पडलेला असणार. तिकडे काय पाहायचं?" आजोबा वैतागून म्हणाले.

आजीने आपला मंत्र सुरू केला, "बूट काढा, स्टँडवर ठेवा. शाळेची सॅक व्यवस्थित ठेवा. कपडे बदला. हात पाय धुवा आणि जेवायला चला."

जेवताना अन्वय म्हणाला, "तिथे आम्ही एक विचित्र प्रकार पाहिला. ते पाहताना आम्हा मुलांची तर हसून हसून मुरकुंडी वळली. थोड्या वेळाने तो प्रकार करणारा माणूस आमच्याकडे पाहून फिदीफू पिदीफू हसू लागला. कम्माल आहे!"

"म्हणजे काय झालं काय असं?"

"त्या बारापैकी तीन वर्गखोल्या मस्त बांधून झाल्या आहेत. तर एक माणूस हातात पाइप घेऊन त्या मस्त गुळगुळीत भिंतींवर टूर्र टूर्र करून पाणी उडवत होता. सगळ्या भिंती ओल्या आणि खाली सगळा चिखल; तरीपण तो पाणी फवारतोच आहे."

पदराला हात पुसत आजीने विचारलं, "मग काय झालं?"

"अगं त्यावेळी दक्ष म्हणाला, 'हे काय असे भिंतीला पाणी घालतात? भिंत म्हणजे काय बाग आहे का? की भितींच्या आत झाडं आहेत?' हे ऐकताच आम्ही सगळे फसफसून हसू लागलो."

"बरोबरच आहे त्या माणसाचं.." असं आजीने म्हणताच अन्वय किंचाळला, "काऽऽय? भितींच्या आत झाडं

असतात आणि ती पाणी पीत असतात?"

हे ऐकताच आजोबांना जोराचा ठसका लागला.

आजोबांना पाणी देत आजी म्हणाली, "तुमच्या पोटातल्या झाडांना जरा पाणी पाजा."

आता अन्वय पुरताच चक्रावला. त्याने हसतच विचारलं, "म्हणजे? आज्जोंच्या पोटात झाडं?"

पाणी पिऊन ढेकर देत आज्जो म्हणाले, "अरे जशी भिंतीत झाडं नसतात तशी माझ्या पोटात पण नसतात. पण तरीही माणसांना पाणी प्यावं लागतं आणि भिंतींना पाणी पाजावं लागतं."

"पण काऽऽ?"

"माणूस आणि भिंती मजबूत होण्यासाठी."

"आज्जो नीट सांगा ना..''

"तुमच्या त्या तीन वर्गखोल्यांच्या भिंती बांधून झाल्या की त्या भिंतींच्या विटांवर सिमेंटचा एकसारखा थर देण्याचं काम गवंडी करतात. यालाच इंग्रजीत प्लास्टरींग करणं असं म्हणतात. प्लास्टरींग केल्याने भिंत गुळगुळीत तर दिसतेच, पण बांधकाम अधिक पक्कं होतं."

"आज्जोऽऽ, पण त्यासाठी भिंतीला पाणी का पाजायचं? ते नाही कळलं."

चित्र- गिरीश सहस्रबुद्धे

"सांगतो. सिमेंट ही अतिशय मऊ राखाडी रंगाची कोरडी पावडर असते. कॅल्शियम सिलिकेट आणि कॅल्शियम ॲल्युमिनेटस् या दोन रासायनिक पदार्थांचं मिश्रण म्हणजे सिमेंट. सिमेंटमधे बारीक वाळू व पाणी मिसळून त्याचं पातळसर मिश्रण तयार करतात व त्याचा थर विटांवर देतात. सिमेंटमध्ये पाणी मिसळलं की रासायनिक बदल होऊन सुईसारखे लांब स्फटिक तयार होतात. हे स्फटिक एकमेकांच्यात अगदी घट्ट बसल्याने प्लास्टर कडक व मजबूत होतं. आणि ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी भरपूर पाण्याची गरज असते. यासाठी किमान एक आठवड्याचा अवधी लागतो."

"बापरे! म्हणजे एक आठवडा रोज भिंतींना पाणी पाजलं पाहिजे."

"बरोब्बर. सिमेंटमध्ये भरपूर पाणी शोषून घेण्याची क्षमता असते ती यासाठीच! सिमेंट एकसारखं ओलं राहणं गरजेचं असतं. म्हणून पाणी कमी पडलं तर.."

आज्जोंना थांबवत अन्वय म्हणाला, "मी सांगतो. पाणी कमी पडलं तर, रासायनिक प्रक्रिया होणार नाही. त्यामुळे ते सुईसारखे स्फटिक तयार होणार नाहीत. त्यामुळे प्लास्टर भुसभुशीत होईल."

"शाबास! एकदम बरोबर. तर आता तुम्हांला जर वेळ मिळाला तर तुम्ही तुमच्या ताईंची परवानगी घेऊन या नवीन भिंतींना पाणी पाजा..."

"म्हणजे आमची शाळा मोठी होईल, उंच होईल आणि मजबूत होईल!"

अन्वयला शाबासकी देत आजी म्हणाली, "जे कुणाचीही तहान ओळखून त्यांना पोटभर पाणी पाजतात, अशीच माणसं राजवाडा उभारतात' ही हुनान प्रांतातली चिनी म्हण लक्षात ठेव.

-राजीव तांबे

rajcopper@gmail.com

(प्रसिद्ध बालसाहित्यिक)

Hide & Seek

Illustrated by Mahimkar Sisters




Some objects are playing hide & seek below, can you find them all?
Scarf
Wooden stick
Cup
Receipt
Icecream

'राष्ट्रीय दिव्यांग रोल मॉडेल' पुरस्कार राष्ट्रपतींकडून स्वीकारताना प्रथमेश दाते

दिव्यांग रोल मॉडेल

अलीकडेच इचलकरंजीच्या प्रथमेश दाते याला राष्ट्रपतींकडून केंद्रीय 'सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालया'चा 'राष्ट्रीय दिव्यांग रोल मॉडेल' पुरस्कार मिळाला. राष्ट्रपतींकडून पुरस्कार घेण्याची ही त्याची तिसरी वेळ होती. प्रथमेश दाते याचं कर्तृत्व जाणून घेऊ या.

खरं तर जन्माला येताना ह्या प्रथमेशवर खूप अन्याय झाला होता. खूप अशक्त, विळविळीत मांसाचा गोळा होता तो! राठ केस, बुद्धी कमी असलेला हा मंगोलबेबी. बाळ असताना त्याला कापूस दुधात भिजवून त्यातलं दूध थेंबाथेंबाने पाजावं लागे, तेव्हा कुठे चमचाभर दूध पोटात जाई. एक ग्रॅम वजन वाढलं तरी खूप समाधान वाटायचं त्याच्या पालकांना. शेजारचे त्याच्या आईला म्हणत, 'डाऊन सिंड्रोम, मतिमंद असलेल्या अशा या बाळाला जगवता तरी कशाला?'

मग आईला खूप दुःख वाटायचं, रडू यायचं. आईबाबांनी ठरवलं की आपण याच्या

जगण्यासाठी खूप प्रयत्न करायचे, मागे हटायचं नाही.

छोट्या वयात त्याला अनेकदा डॉक्टरकडे न्यावं लागलं, तेही इचलकरंजीहून पुण्याला. कमकुवत हाडं, नाजूक प्रकृती त्यामुळे खूप वेळा शस्त्रक्रियाही झाल्या. पण शरीराला ताठपणा येत नव्हता. जे कोणी सांगतील ते प्रयत्न आईबाबा करायचे. पाठीच्या कण्याच्या ताठपणासाठी लाकडी खोक्यात त्याचे पाय अडकवून त्याला खांबाला बांधून ठेवत. छोटा प्रथमेश सुटकेसाठी जिवाच्या आकांतानं रडायचा. मनावर दगड ठेवून आईबाबांना हे करावं लागायचं. शिवाय नीट बोलण्यासाठी स्पीच थेरपी, जिभेचे व्यायाम... अगदी संस्कृतची शिकवणीही सुरू केली.

सर्वसामान्य मुलांसारखा प्रथमेशही शाळेत गेला. सुरुवातीला तो वर्गात खूप मुलं पाहिली की गांगरून जायचा. कुणी मोठ्यानं बोललं किंवा वेगवगळे रंग पाहिले तरी त्याला भीती वाटायची, आणि घाबरून त्याची चड्डी ओली व्हायची. त्याची आई वर्गाबाहेरच बसून राहायची. वर्गातून हाक आली की जमीन स्वच्छ करून त्याची चड्डी बदलायची. दिवसभरात डझनभर तरी चड्ड्या शाळेच्या कुंपणावर वाळत पडायच्या. आईची ही तपश्चर्या वर्षभर चालली नि कसंबसं त्याचं प्राथमिक शिक्षण पूर्ण झालं.

पुढे माध्यमिक शाळेत आणखी खडतर काळ होता. प्रथमेश अशक्त आणि प्रत्येक अवयवात दोष, त्याचे पाय सपाट असल्यामुळे त्याला कवायत नीट येत नाही, म्हणून एकदा शिक्षकांनी मारलंदेखील! त्याचं दिसणं, वागणं वेगळं असल्यानं मुलं चेष्टा करायची, कोणी त्याला चिमटे काढायचे, कोणी केस ओढायचे, कधीतरी कोणी खट्याळ मुलं त्याचा डबासुद्धा मातीत फेकून देत. कुणीही यावं आणि याला त्रास द्यावा, असं वातावरणही त्याला अनुभवायला मिळालं. अशा वेळी प्रथमेशला घायाळ झालेलं पाहून आईबाबा खूप दुःखी होत.

तरी त्या छोट्या वयात प्रथमेशला आईबाबांनी काय-काय शिकवलं सांगू?- तबला, पेटी, बासरी, सायकल, चित्रकला, क्रिकेट, लेझीम, बुद्धिबळ, अभिनय, संगणक नि खूप काही. शिवाय स्वावलंबनासाठी पांघरुणाची घडी घालणं, बूटपॉलिश, चहा करणं, कूकर लावणं अशा अनेक गोष्टी प्रथमेशला शिकवल्या. केवळ शिकवून त्याला पुरायचं नाही, सरावपण करून घ्यावा लागे.

संगणकावर डीटीपी करता येत असल्यामुळे त्याला एका दैनिकात नोकरी लागली. मात्र रात्रपाळीचं काम असल्याने त्याला ते झेपेना. मग 'आयुका'च्या उच्चाधिकाऱ्यांनी ग्रंथालयाचं सोपं सॉफ्टवेअर प्रथमेशला शिकवलं आणि मग त्याचे दिवस बदलले.

इचलकरंजीच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या D.K.T.E. संस्थेच्या टेक्स्टाइल इंजिनिअरींग कॉलेजमध्ये 'ग्रंथपाल-साहाय्यक' म्हणून प्रथमेशला नोकरी मिळाली. पुस्तकाच्या नोंदी, देवाण-घेवाण, लेट-फी ही सर्व कामं प्रथमेश करतो.

गेली १३ वर्षं तो ही नोकरी करत आहे. वाचनाच्या वेळेत प्राध्यापक ग्रंथालयात यायला विसरले तर त्यांना आठवण करून द्यायचं काम प्रथमेशचं असतं. मुलाचं बौद्धिक दिव्यांगत्व आईबाबांनी स्वीकारून त्याला घडवण्यासाठी खूप कष्ट केले आणि ते सार्थकी लागले. २०१०साली त्याला 'दिव्यांग असूनही कर्तबगार' म्हणून पहिला राष्ट्रीय

प्रथमेशचे आईबाबा

'वयोश्रेष्ठ प्रतिष्ठित माता' पुरस्कार स्वीकारताना शारदा दाते

पुरस्कार मिळाला. पुढे अनेक सन्मान मिळत गेले.

एकत्र कुटुंबात राहणारा प्रथमेश, काका, चुलत भावंडं, त्यांची बाळं या सर्वांवर प्रेम करतो. तसेच विचार सात्त्विक असल्यामुळे प्रथमेश दरमहा काही पैसे समाजकार्यासाठी देतो. अगदी आईबाबांसाठी त्याने मोटारही घेतली आहे.

वयाने थकलेले आईबाबा जरा कुठे आनंदाचे क्षण अनुभवत असताना आईला कॅन्सरचं निदान झालं. शारीरिक यातनांची भर पडली. सारं सहन करून ती बरी झाली. नंतर त्याच्या आईने घरात दिव्यांग मुलांच्या पालकांसाठी समुपदेशन केंद्र सुरू केलं. महाराष्ट्रातल्या विविध भागांतून पालक यायला लागले. त्यांना यांच्या अनुभवाचा फायदा व्हायला लागला. प्रथमेशची प्रगती ऐकून सारे पालक अवाक होतात.

दरवर्षी जगातील डाऊन सिंड्रोम मुलांची व पालकांची आंतरराष्ट्रीय परिषद भरते. २०१२ साली हा मान भारताकडे होता. परिषद चेन्नईला झाली. त्यात २५ देशांचे ४०० प्रतिनिधी होते. तिथे प्रथमेशने सर्व सहभागी अभ्यागतांचे स्वागत केले. सर्वांशी छान संवाद साधला! त्याच्या कार्यकर्तृत्वावर दहा भाषांत मिळून ८० लेख प्रसिद्ध झाले आहेत. २०१२ सालचा आंतरराष्ट्रीय 'डाऊन सिंड्रोम' पुरस्कार मिळवणारा तो पहिला भारतीय.

दरवर्षी भारतातल्या एका मातेला 'वयोश्रेष्ठ प्रतिष्ठित माता' म्हणून राष्ट्रपती पुरस्कारानं गौरवलं जातं. २०१९ सालच्या मानकरी होत्या, शारदा यशवंत दाते म्हणजेच प्रथमेशची आई!

'माझ्याच बाळाबाबत अन्याय का?' असं सुरुवातीला म्हणणाऱ्या शारदा यशवंत दाते आज अभिमानाने मातृत्व मिरवताना म्हणतात की, "मला माझ्या प्रश्नाचं उत्तर केव्हाच मिळालंय. माझ्या सक्षम हातात नियतीनं आपलं नाजूक अपत्य विश्वासाने सोपवलं. आज त्यांना म्हणावंसं वाटतं- 'बाळा होऊ कशी उतराई, तुझ्यामुळे मी झाले आई!"

– शोभा नाखरे
shobha.nakhare@yahoo.co.in
(कर्णबधीर मुलांच्या अनेक पुरस्कारप्राप्त शिक्षिका व निवेदिका)

चपखल

ऱ्हस्व-दीर्घ लेखन (३)

ही 'इ' आणि 'उ' अक्षरे शब्दातील शेवटच्या अक्षराला खूप घाबरतात असे वाटते. गेल्या वेळी पाहिले की शब्दातील शेवटचे अक्षर 'आ', 'ई' किंवा 'ऊ' असेल तर आधीचे 'इ' किंवा 'उ' ऱ्हस्व लिहायचे. पण ते शेवटचे अक्षर 'आ', 'ई' किंवा 'ऊ' नसेल तर...?

अपवाद : शब्द मूळ संस्कृत असेल (तत्सम) तर मात्र हा नियम लागू होत नाही, तो शब्द जसा असेल तसा लिहायचा. उदा. – गुण, विष, कौतुक इत्यादी

नियम- शब्दाच्या शेवटी 'अ' असेल आणि त्याच्या आधी 'इ' किंवा 'उ' असेल तर ते अक्षर, सामान्यतः, दीर्घ म्हणजे 'ई' किंवा 'ऊ' असे लिहावे; जसे बहीण, फूल, तूप

खालील शब्दांतील ऱ्हस्व-दीर्घ चुकीचे असल्यास ते बरोबर लिहा.

१	अट्ठावीस	
२	अट्ठेचाळिस	
३	कठिण	
४	अभूतपुर्व	
५	दिप	
६	आसुड	
७	उंदिर	
८	कंदिल	
९	कणिक	
१०	कबूल	

११	करमणुक	
१२	कापुस	
१३	काळीज	
१४	कुलुप	
१५	गणाधिश	
१६	गपचुप	
१७	गिचमिड	
१८	चीड	
१९	जमिन	
२०	जिभ	

चपखलची उत्तरे पान क्रमांक- ३९वर

-प्रतिभा गोपुजकर
gopujkars@hotmail.com
(ज्येष्ठ लेखिका)

Think Positive...

It's real fun!

It was Ganesh Chaturthi morning, the commencement of ten-day long Ganpati festival. Pandals were erected everywhere and the atmosphere was electrifying.

Ravi had a holiday that day. He had come to help his father at their mithai shop as there would be a rush of customers today wanting to buy different mithais. Standing at the shop's counter, Ravi was observing a pandal being readied right across the road. His father had just stepped outside the shop.

"Ganpati will be huge after two years." Ravi said to one of the shop-helpers.

"Yes, Ravi Bhaiyya, Corona affected so many; somebody's life, somebody's business."

"Look at that pandal's decoration. Huge cut-out of Veerbhadram defeating the spiky Corona ball. Even after two years, this craze for Veerbhadram still lingers." Ravi beamed as his memory flashed back some two and half years ago! He suddenly remembered Kamlakar……

"Uncle, will this bus go to Glitz film studios?" Ravi asked an old man standing at the bus stop.

"Yes." He replied. Ravi climbed inside and took a window seat. The man came and sat next to him.

"Want to work in films, eh? Running away from home or something?" The old man asked smiling.

"No!" Ravi exclaimed.

"But you just mentioned Glitz…"

"My friend stays nearby."

"Do you watch films then?"

"Yes."

"Which is the latest one you've seen?"

"Veerbhadram…"

"Did you like it?"

"Of course… It's such a huge hit!"

"I am Kamlakar, Assistant Director to G. Narayan." Kamlakar shook hands with Ravi.

"G. Narayan! The famous Director of Veerbhadram!"

"Yes. I am assisting him for last forty years. You can find my name in all his films' credits." Kamlakar opened his wallet and showed a photograph in which he was flanked by G. Narayan, and Veerbhadram

film's hero, Vishwa.

"I am a huge Vishwa fan." Ravi pointed to his water bottle that had a picture of Veerbhadram aka Vishwa printed.

"What's your name?"

"Ravi Mishra..."

"Vishwa is coming next month for shooting at Glitz. Would you like to meet him?"

"Will they allow me?"

"Sure! Just mention my name 'Kamlakar' at the studio gate. I will pick you and give you a studio tour. It's real fun." Kamlakar said enthusiastically. Ravi was elated as he was always curious to know how films were shot.

By this time, 'Glitz Studio' stop had arrived. Both got down. Ravi stood there for a few moments watching Kamlakar enter the studio gates. Later, pandemic hit and Ravi never got a chance to visit the studios…

"Bhaiyya, take the customer's payment." Ravi got back to attending the customer though these thoughts were subconsciously playing in his mind. When he got some free time, he opened his father's mobile and searched for 'Glitz Studios'.

"'Glitz Studios' finally shuts… Historical landmark of city soon to be up for sale…'" Ravi read a news headline aloud.

"Bhaiyya, this was expected. The studio was incurring losses lately. It's such an old film studio; was a big part of our childhood as we stayed close by. I remember having seen so many film stars there... Last year, many workers lost their jobs at Glitz. One of my friends worked as a spot boy there. Luckily, he got a job in another studio." The shop-helper said. Ravi then recounted how he had met Kamlakar.

"Bhaiyya, my friend is at least young. God knows what happens to seniors after they lose out on work."

Ravi grew anxious thinking where Kamlakar would be now. But as the day progressed, he got busy catering to hordes of customers coming to their shop.

That evening, as Ravi and his father were enjoying a hot cup of tea at the shop, their attention was diverted to a huge band leading a Ganpati procession. The band-wallas were beautifully playing devotional songs. Just then, Ravi noticed an old man in blue uniform, playing the trumpet.

"Baba, that's Kamlakar! Remember I had told you about him…" Ravi almost shouted.

"Are you sure?"

"Hundred percent..."

As the music stopped, Kamlakar sat on a nearby bench. He looked extremely exhausted.

"Baba, we got to help him." Ravi's father went to Kamlakar and coaxed him to the shop. He made him sit comfortably and gave him water.

"Have you eaten anything?" Baba enquired.

"No; played the band in three Ganpati processions since morning; didn't find time to eat." Kamlakar answered feebly. Baba immediately got him some samosas and mithai.

"I lost my wallet. I don't have the money, Sir." Kamlakar said. Ravi's father just patted his shoulder.

"Uncle, did you also lose that

photo then?" Ravi asked curiously.

"Which photo?" Kamlakar looked up astonished.

"With G. Narayan and Vishwa..."

"That's in... Wait... How do you know?"

"Remember me?" Ravi came forward. Kamlakar looked carefully but couldn't.

"Two years ago, we met in a bus. I had asked if it went to Glitz..."

"Ah! Glitz..." Kamlakar sighed, "Vishwa fan, right? Forgot your name though... At Glitz, we celebrated Ganpati with great fervour. I was the one who selected the Ganpati idol every year. So much Narayan Sir believed me. But after they started suffering losses and with the new generation stepping in, oldies like me were just chucked out." Kamlakar's eyes moistened.

"You must have been angry then." Ravi's obvious question!

"Angry? Not at all! I can only be grateful. I was always a busy assistant director in Glitz; whatever I am is because of Narayan Sir. In fact, I learnt playing the trumpet at Glitz. See, it got me a job as band master. Otherwise, what I would have done? In any situation, your knowledge and experience always stays with you. I have no bad feelings." Kamlakar replied as he finished his samosa.

"That's so generous of you, Sir." Ravi's father admired.

"Uncle, how can all of you play a song so synchronously in the band? There is just no note that goes off-key." Ravi changed the topic consciously.

"Then you should come to see how we practice. We always assemble at 'Glory' band shop in Raja chowk. The glitz is gone but glory still remains." Kamlakar smiled heartily.

"Will they allow me?"

"Sure! Just mention my name 'Kamlakar' at the shop. I'll pick you and show you around. It's real fun." Kamlakar thanked everyone and returned to his band.

"Baba, he is so optimistic!" Ravi was amazed to feel that same enthusiasm in Kamlakar's voice.

"He's like a magnet; always attracting positives and repelling the negatives." Baba concluded. Ravi couldn't have agreed more as he now eagerly awaited their next meeting.....

-Prachi Mokashi
mokashiprachi@gmail.com

निसर्गातल्या सगळ्या जीवांनाही आपल्यासारखे दोनच डोळे असतात असे नाही. कुणाला चार, कुणाला आठ, तर कुणाला शेकडो डोळेही असतात. आणि डोळ्यांचे आकार व जागाही वेगवेगळ्या असतात...

डोळे कुठे, किती!

निसर्गातल्या सगळ्या जीवांची विभागणी ढोबळपणे कणा-वान म्हणजे व्हर्टिब्रेट आणि कणा-हीन म्हणजे इनव्हर्टिब्रेट्स अशा दोन गटांमध्ये केलेली आहे. यातील कणावान प्राण्यांच्या गटामध्ये सर्वसाधारणपणे शरीराची रचना एकसारखी पाहायला मिळते. म्हणजे बहुतेक सगळ्यांना दोन डोळे, दोन कान, एक नाक, एक तोंड असते. पण इनव्हर्टिब्रेट्समध्ये मात्र असा काही नियम दिसत नाही. तिथे मात्र 'प्रत्येकाचे

वुल्फ स्पायडर

रूप आगळे' असते. बिन कण्याच्या गटामध्ये डोळ्यांची संख्या वेगवेगळी असते. आपल्या शरीरातून तंतू बाहेर काढून त्याचे जाळे विणण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या कोळ्याला जसे इतरांपेक्षा जास्त, म्हणजे आठ पाय असतात तसेच चक्क आठ डोळेही असतात. कोळ्याच्या डोक्यावर एकामागे एक अशा दोन रांगांमध्ये मिळून हे आठ डोळे असतात. यातील फक्त एकच जोडी जी मध्यभागी असते, तीच खऱ्या अर्थाने 'पाहण्याचे' काम करू शकते. कोळ्याच्या डोळ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे अत्यंत कमी प्रकाशात, काळोखातही त्यांना पाहाता येते. ज्या डोळ्यांनी ते प्रत्यक्ष पाहू शकत नाहीत, अशा दुय्यम डोळ्यांमध्ये एक प्रकारचे अस्तर असते. त्याला 'टॅपेटम' म्हणतात. त्यामुळे कोळ्यांच्या डोळ्यांत शिरणारे प्रकाश-किरण तात्काळ परावर्तित होतात आणि कोळ्याला समोरच्या वस्तूबाबत अंदाज करता येतो. 'वुल्फ स्पायडर' जातीचे कोळी या रचनेमुळेच संध्याकाळच्या अंधुक प्रकाशात किंवा रात्रीच्या धूसर प्रकाशातही आपलं भक्ष्य अचूक पकडू शकतात.

कोळ्यांना असे आठ डोळे का असावेत? तर कोळ्यांना मान नसते, त्यामुळे! आपल्यासारखे किंवा माकडासारखे ते मान हलवून दोन्ही बाजूला बघू शकू नाहीत. ही उणीव दूर करायला त्यांना बाजूचेही बघता यावे, म्हणून त्यांना डोक्यावर अर्धवर्तुळाकार आकारात डोळे दिलेले आहेत.

कणाहीन प्राण्यांच्या गटातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण डोळे म्हणता येतील ते 'चतुर'- ड्रॅगनफ्लायचे. चतुरांचे डोळे हे कम्पाउंड आय म्हणजे 'संयुक्त डोळे' या प्रकारातले असतात. मुळात चतुराच्या डोळ्यांचा आकार त्याच्या डोक्याच्या आकाराच्या तुलनेने खूपच मोठा असतो. माणसाच्या शरीराशी तुलना करून सांगायचे झाले, तर समजा आपले डोळे डोक्यात घालण्याच्या हेल्मेटच्या आकाराचे

ड्रॅगनफ्लाय

असते तर किती मोठे असते? तितके चतुराचे डोळे मोठे असतात! शिवाय माणसांच्या, पक्ष्यांच्या डोळ्यांत एकच लेन्स असते, पण चतुरांच्या डोळ्यांमध्ये सुमारे तीस हजारपर्यंत लेन्सेस असतात. त्यांना 'ओमाटिडिया' म्हटले जाते. शंकूच्या आकाराच्या या लेन्सेस त्यांच्यावर पडणाऱ्या प्रकाशाचे विश्लेषण करून चतुराच्या मेंदूकडे त्यांना दिसणाऱ्या प्रतिमा पोहोचवतात. डोळ्यांच्या या रचनेमुळे चतुराला एकावेळी ३६० अंशातले दृश्य दिसत असते. मात्र हजारो डोळे असूनही चतुराला माणसाइतके सुस्पष्ट दिसत नाही. त्याला माणसाप्रमाणे आपली नजर दूरच्या गोष्टीवर केंद्रित करता येत नाही, त्यामुळे फक्त जवळच्या वस्तूंच्या प्रतिमाच त्याच्या डोळ्यांमार्फत मेंदूवर नोंदल्या जातात.

डोळ्यांच्या संख्येच्या बाबतीत चतुरालाही मागे टाकणारा एक जीव आहे. त्याचं नाव चिटोन

स्पायडरचे डोळे

आढळणारा 'ॲनाबेप्लिडे' फॅमिलीतील एक मासा. या माशाला 'फोर आइड फिश' असेच नाव आहे. तसं बघायला गेलं तर या माशाला डोळे दोनच असतात. मात्र त्यांची रचना अशी असते की एकाचवेळी तो स्वतंत्रपणे पाण्याखाली आणि पाण्यावरती पाहू शकतो. त्याचे बटबटीत डोळे त्याच्या डोक्यावर असतात. त्यांची विभागणी डॉर्सल (वरच्या बाजूला) आणि व्हेंट्रल (खालच्या बाजूला) अशी असते. प्रत्येक डोळ्यात दोन स्वतंत्र बाहुल्या आणि दोन नेत्रपटल असल्याने चार डोळ्यांनी हा मासा पाहू शकतो.

(किंवा कायटन). हा मोल्युस्क म्हणजे कालवांच्या प्रकारातला जीव आहे. सागर किनाऱ्यावरच्या उथळ भागात प्रामुख्याने हा जीव बघायला मिळतो. या प्राण्याच्या अंगावर आठ शिंपल्यांचे मिळून बनलेले कवच असते. या प्राण्याच्या शरीरावर अक्षरशः शेकडो डोळे असतात, असं म्हणता येईल. या डोळ्यांना 'एस्थेट्स' म्हणतात. असे डोळे फक्त याच प्राण्याला मिळालेले आहेत. या एस्थेट्समध्ये प्रकाशाला संवेदनशील अशा पेशी असतात. यातील काहींमध्ये फोटोरिसेप्टर सेल्स असतात. मात्र या शेकडो डोळ्यांमधील काहीच, निवडक डोळ्यांनीच या प्राण्याला खऱ्या अर्थाने बघता येते.

दोनपेक्षा अधिक डोळे असलेल्या प्राण्यांचे प्रकार मुख्यतः इनव्हर्टिब्रेट्सच्या गटात सापडत असले, तरी बहुधा नियमाला अपवाद म्हणून कणा-वान प्राण्यांमध्येही काही असे नमुने आहेत. त्यातला एक म्हणजे अमेरिका खंडाच्या सागरकिनाऱ्यांवर

जास्तीचा डोळा असलेला आणखी एक कणा-वान प्राणी म्हणजे न्यूझिलंडमध्ये आढळणारा 'टुआतारा'. सरड्याशी साधर्म्य असलेल्या ह्या रेप्टाइल गटातील प्राण्याच्या डोक्यावर तिसरा डोळा असतो. या डोळ्याला 'पॅरीटल आय' म्हणतात. टुआताराच्या बालवयात हा डोळा स्पष्टपणे दिसतो, नंतर मात्र अपारदर्शक खवल्याने तो झाकला जातो. तसाही या डोळ्याचा उपयोग बघण्यासाठी होत नाही, तर शरीराच्या तापमानाचे नियंत्रण करण्यासाठी होतो.

ही सगळी उदाहरणं पाहिल्यावर निसर्गाने आपल्याला दोनच डोळे दिले असले तरी ते खरोखरच शेकडोंच्यापेक्षा उपयुक्त आहेत, याची खात्री पटते ना!

-मकरंद जोशी
makarandvj@gmail.com
(निसर्ग अभ्यासक व लेखक)

(लेखातील फोटो युवराज गुर्जर)

शब्दांचं बारसं

रोबो- **जगभरातील** विविध देशांमध्ये पूर्वी जमीनदारी पद्धत होती. म्हणजे जमीनदाराच्या मालकीची खूप सारी जमीन असे आणि अनेक मजूर तिथे काम करत असत. काही ठिकाणी, मालकाच्या जमिनीचा छोटा भाग मजुरांनी स्वतःसाठी कसायचा, म्हणजे त्या जमिनीवर जे पीक येईल ते त्या मजुरांचे- अशी ही पद्धत होती.

१९२० मध्ये करेल चापेक (Karel Capek) या झेक नाटककाराने एक नाटक लिहिले. त्यामध्ये सांगाल तसे काम करणाऱ्या मजुरांना Lebor असे लॅटिन नाव दिले होते. या करेलचा धाकटा भाऊ होता, जोसेफ नावाचा. त्याने सुचवले की Lebor पेक्षा Robot हे नाव जास्त चांगले! करेलला ते पटले. कारण युरोपातील ऑस्ट्रियन-हंगेरियन राजवटीत जमीनदारांच्या वेठबिगार मजुरांना ज्या पद्धतीने काम करायला लावले जाई, त्या पद्धतीला रोबो (Robot) असे म्हटले जाई. 'Rossum's Universal Robots' नावाचे ते नाटक तुफान चालले आणि काही काळाने 'रोबो' हा शब्द इंग्रजी भाषेत रुजला.

त्यामुळे आपण सांगू ते काम करणाऱ्या तंत्र-मानवाला 'रोबो' हा शब्द चपखल बसला!

-वसुंधरा देवधर
vasudeo55p@gmail.com

विनोद

▶ **एकदा एका पुणेरी माणसाला नेपोलियन भेटतो.**
नेपोलियन- माझ्या डिक्शनरीमध्ये अशक्य हा शब्दच नाही!
पुणेरी- आता सांगून काय उपयोग? घेतानाच बघून घ्यायची ना!

चपखलची उत्तरं

१. कणिक २. लुकुक ३. कामगार ४. कलाकार ५. कलाकुसर ६. कलाकार ७. कलाकुसर ८. कलाकार ९. कलाकार १०. कलाकार ११. कलाकार १२. कलाकार १३. कलाकार १४. कलाकार १५. कलाकार १६. कलाकार १७. कलाकार १८. कलाकार १९. कलाकार २०. कलाकार २१. कलाकार

सुटका



जॉर्ज मॅक्डोनाल्ड हे एक प्रसिद्ध स्कॉटिश लेखक. सुमारे शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी, ठरावीक पद्धतीच्या परीकथा सोडून त्यांनी छोट्या मुलांसाठी नवीन अद्‌भुत कथा लिहायला सुरुवात केली. त्या कथा वाचकांना तर आवडल्याच, पण गेल्या शंभर दीडशे वर्षांत अद्‌भुत कथा लिहिणाऱ्या अनेक नामवंत लेखकांना त्यातून प्रेरणा मिळाली.

त्यांच्या 'द प्रिन्सेस अँड द गॉब्लिन' या लोकप्रिय कादंबरीतील एका भागाचा हा स्वैर आणि संक्षिप्त अनुवाद.

राजकुमारी आयरीनला घाबरून जाग आली, तेव्हा अजून पहाट झाली नव्हती. अर्धवट झोपेत तिला तिच्या खोलीत फिस्कारण्याचे, धडपडीचे, मारामारीचे आवाज येत होते. ती नीट जागी झाली, तेव्हा खोलीत कोणीच नव्हते, पण तरी तिची भीती जाईना. काय करावे? तेवढ्यात तिला आजीने काय सांगितले होते, त्याची आठवण झाली. त्याबरोबर तिने तिच्या बोटातील आजीची अंगठी काढून उशीखाली ठेवली. लगेच ती कोणीतरी हळूच तिच्या हाताखालून उचलली असे तिला जाणवले. 'आजी! ही नक्की आजीच असणार!' ती मनाशी म्हणाली. हा विचार आल्यावर तिची भीती जरा कमी झाली. तिने उठून पायात आपले नाजूक चढाव सरकवले आणि खुर्चीच्या पाठीवर कोणीतरी ठेवलेली निळी झूल पांघरली.

आजी म्हणजे खरे तर राजकन्या आयरीनची खापरपणजी. एकदा राजवाड्याच्या जुन्या, निर्जन भागात खूप खूप जिने चढून गेल्यावर ती आयरीनला भेटली होती.

आजीच्या तिथल्या सुंदर खोल्या, तिथले रंगीबेरंगी पारवे, चंद्रासारखा लख्ख उजेडाचा दिवा आणि ती कातत असलेले तलम, अगदी पारदर्शक वाटेल असे सूत हे सगळे आयरीनने सांगितले, तेव्हा कोणीच त्यावर विश्वास ठेवला नाही. मग आजीच्या

आठ वर्षांची छोटी राजकुमारी आयरीन अगदी लहान असतानाच तिची आई आजारी पडून देवाघरी गेली. आणि महाराज म्हणजे तिचे वडील सतत आपल्या डोंगराळ राज्याच्या वेगवेगळ्या भागांचा दौरा करण्यात गुंतलेले. त्यामुळे तिला तिच्या दाईबरोबर गावाकडच्या स्वच्छ मोकळ्या हवेत राहायला पाठवले होते. डोंगर उताराच्या मधोमध एका प्रशस्त जागी तिचा राजवाडा होता. सभोवताली बागा आणि मळा होता. तिथून थोड्या अंतरावर खाणी होत्या आणि खाणीत काम करणाऱ्या मेहनती, निष्ठावान लोकांची घरे होती. कर्डीचे घर तिथेच होते. कर्डी म्हणजे राजकुमारीला नव्याने मिळालेला बारा वर्षांचा साहसी, हुशार मित्र. गॉब्लिन लोकांची कटकारस्थाने शोधून काढण्याचा प्रयत्नात असताना तो दुर्दैवाने अगदी एकटाच त्यांच्या तावडीत सापडला होता.

गॉब्लिन म्हणजे कोण? माणूसजातीबद्दल मनात सूडाची भावना धरून जमिनीच्या पोटात, खोल खोल अंधाऱ्या जागांमधे वस्ती करणारे, लपूनछपून राहणारे, विचित्र लोक. बुटके पण ताकदवान, धूर्त, डोकेबाज पण दुष्ट. माणसांचा नायनाट हे एकच त्यांचे उद्दिष्ट. कर्डीला आता त्यांच्या कैदेतून कोण सोडवणार?

अंगठीशी जोडलेल्या अदृश्य सुताचा धागा संकटाच्या प्रसंगात आयरीनला रस्ता दाखवेल हे तरी कोणाला खरे वाटले असते! पण आयरीनचा मात्र त्यावर पूर्ण विश्वास होता. तिने उजव्या हाताची तर्जनी पुढे धरून धागा शोधायचा थोडासा प्रयत्न केल्यावर तिच्या बोटाला लगेच धागा सापडला. त्यावर बोट धरून ती पुढे निघाली. हा धागा आपल्याला जिन्याने वर आजीकडे नेईल, असे तिला वाटत होते, पण धागा तर खालच्या दिशेने निघाला, तोही अगदी जमिनीलगत. तो धरून चालण्यासाठी राजकन्येला पूर्ण खाली वाकूनच चालावे लागत होते.

चालता चालता राजवाड्याच्या मागच्या भागातील अरुंद रस्ते पार करत आणि जिने उतरत ती थेट मुदपाकखान्यात पोचली. तिथे काही दासी उठून सकाळच्या कामांना लागल्या होत्या आणि दार उघडलेले होते. त्या दारातून, मागच्या अंगणातून राजकन्या थेट बाहेरच्या प्रवेशद्वाराशी पोचली. तिला कोणी पाहायच्या आत ती राजवाड्यातून बाहेर डोंगरउतारावर गेलीसुद्धा. आता मात्र धागा तिच्या कमरेइतका वर आला. तो पकडून ती आता उभी झाली, आणि न वाकता नेहमीसारखी चालू लागली.

बाहेर डोंगरावर वाऱ्याच्या ताज्या झुळका वाहत होत्या, पण बोचरी थंडी नव्हती. सूर्य उगवला नव्हता,

पण ढगांच्या खालच्या कडा केशरी, सोनेरी झाल्या होत्या. कडेला मधूनच प्रिमरोझची फुले उमललेली दिसत होती. गवतावरचे दवबिंदू हिऱ्यासारखे चमचमत होते, आणि राजकन्येला रस्ता दाखवणारा नाजूक धागासुद्धा पहाटेच्या प्रकाशात चांदीच्या तारेसारखा लकाकत होता. तो तिला कुठे घेऊन जाणार आहे, हे तिला मुळीच माहीत नव्हते, पण तरी त्यावरचे बोट न सोडता ती उत्साहाने पुढे निघाली.

बरेच अंतर चालून गेल्यावर धागा डावीकडे वळून पुन्हा उताराच्या रस्त्याला लागला. खाली, खाली, पुन्हा जरा वर आणि परत खाली- सपाट रस्ता सोडून आता खडबडीत, खडकाळ रस्ता सुरू झाला. मध्येच एक खळखळत वाहणारा झरा लागला. त्याच्या कडेकडेने रस्ता आणि धागा पुढेपुढेच चालला, आणखी जास्त उताराच्या आणि दगडधोंड्यांच्या वाटेने! आता सूर्य क्षितिजावर आल्यामुळे दिशा चांगल्या उजळल्या होत्या. खडकांवर सूर्यकिरणे खेळत होती. त्याच उजेडात राजकन्येला एका छोट्या गुहेच्या तळातून झुळझुळ बाहेर वाहत आलेला एक ओहोळ दिसला. आणि आश्चर्य म्हणजे धागा त्याच छोट्या अंधाऱ्या गुहेत शिरला होता.

गुहेत शिरायचे? राजकन्या नखशिखान्त शहारली. राजकन्या असली, तरी आठ वर्षांची छोटीशी मुलगीच होती ती! पण ती मागे हटली नाही. गुहा तिला सरळ आत जाता येईल इतकी उंच होती. सुरुवातीला गुहेत थोडा बाहेरचा अंधुक उजेडही येत होता, पण मध्येच एक वळण आले, आणि मग मात्र आत पूर्ण अंधार झाला. धाग्यावरचे बोट मागेपुढे फिरवून पाहत ती डोंगराच्या पोटातल्या त्या पोकळीतून आत आत पावले टाकत राहिली खरी, पण आता मनातून तिला भीती वाटायला लागली होती. 'हा धागा आपोआप तर इथे येणार नाही, नक्कीच तो आजीने पाठवला असणार, मला खात्री आहे,' ती मनाशी म्हणत राहिली. असे जरी असले, तरी अंधारात खोल खोल उतरत जाणारे खडबडीत रस्ते, कोणीतरी अर्धवट खोदलेल्या पायऱ्या, शिड्या उतरत जायचे म्हणजे मोठी परीक्षाच होती. वळणावळणाचा भुयारी रस्ता, वाटेत वाळू, दगड, चुनखडी .. मध्येमध्ये तर तिला रांगत, सरपटतच जावे लागत होते. आपल्याला आणखी जास्त भीती कशी वाटत नाही, याचेच मग तिला नवल वाटायला लागले. 'कदाचित हे सगळं स्वप्न असेल. पण संपू दे बाई आता हे स्वप्न!'

मध्येच तिला वाहत्या पाण्याचा आवाज ऐकू येई, तर मध्येच हातोडीची ठकठक. पण धागा तिला पुढेपुढेच नेत राहिला. खूप वेळानंतर तिला अखेर थोडा उजेड दिसला. ती एका गोल गुहेसारख्या जागी पोचली होती. तिथे कोणीतरी पेटवलेल्या शेकोटीतले निखारे जळत होते. धागा आता इतका उंच गेला की तिला तो धरून ठेवण्यासाठी हात आणि टाचा उंच कराव्या लागत होत्या. तो धरताना तिला गुहेच्या भिंतीकडेला रचलेला दगडांचा ढीग दिसला. त्या ढिगात शिरून धागा दिसेनासा झाला होता. आयरीनला क्षणभर वाटले की, आजी तिला एकटीला त्या भयंकर गुहेत सोडून निघून गेली की काय! किती भीतिदायक विचार ! धाग्याला पकडून परत फिरण्याचाही तिने प्रयत्न करून पाहिला, पण परतीची दिशा धरली, की धागा दिसेनासा होई ! आता मात्र तिला रडूच कोसळले!

थोड्या वेळाने तिला सुचले, की धागा दगडातून पुढे कुठे जातो, ते तरी पाहू! मग तिला परत उत्साह आला ! तिने भराभर ते दगड बाजूला करायला सुरुवात केली. पाठ दुखून आली आणि हाताला खरचटल्याने हात रक्ताळले, तरी तिने दगड, खडी बाजूला करत धागा कुठपर्यंत आत जातो ते पाहायचे काम चालूच ठेवले. अचानक तिला कोणाच्या तरी खणखणीत आवाजातील गाणे ऐकू आले --

"कडकड, कटकट, आपट,
यालाच धरून धोपट !!
कडकड, कटकट, भडका,
भरलीच तुमची घटका !!
कडकड, कटकट, धडाड,
पाडून टाकीन प– "

'कर्डीचा आवाज!' राजकन्या आनंदाने ओरडली. गॉब्लिनना कविता आणि गाणी अजिबात सहन होत नाहीत. त्यांना पळवून लावण्यासाठी नव्या नव्या कविता करणे आणि त्या ठेक्यात नि चालीवर म्हणणे हा कर्डीचा आवडता उद्योग होता.

"कर्डी !" राजकन्येने हाक मारली.

"शश्श, हळू बोल." पुन्हा कुठून तरी कर्डीचा आवाज आला.

"का रे, तू तर चांगला मोठ्यामोठ्याने गातोयस!"

"हो, पण मी इथे आहे, हे गॉब्लिनना माहीत आहे, पण तू इथे आल्याचं कळायला नको ना! बरं, कोण आहेस तू?"

"अरे, मी आयरीन. तू इथे अडकून पडला आहेस म्हणूनच बहुतेक आजीने मला इथे पाठवलंय, तुला सोडवायला. पण इथे इतका मोठा ढीग आहे ना दगडांचा, आत्ता कुठे मी वरचे अर्धे दगड काढले, पण हे खालचे दगड तर खूपच मोठेमोठे आहेत." राजकन्या काळजीच्या स्वरात म्हणाली.

"थांब," कर्डी म्हणाला. "आणखी थोडेसे दगड काढ. तुला खाली आतल्या बाजूने लावलेली फरशी दिसेल. ती दिसायला लागली की बाजूला हो, मग मी ती फरशी आतून ढकलतो." आणि खरंच, आणखी थोडे दगडधोंडे बाजूला केल्यावर आयरीनला ती भलीथोरली फरशी दिसायला लागली. आयरीन बाजूला गेल्यावर कर्डीने सगळी शक्ती एकवटून फरशीला आतून एक जोराची धडक दिली. फरशी आडवी पडली, आणि त्यावर चढून कर्डी बाहेर आला.

"आयरीन, आज तू माझा जीव वाचवलास!" तो हळू आवाजात म्हणाला.

"मला इतका आनंद झालाय, पण चल, आधी आपण या भयंकर जागेतून बाहेर पडू."

"सोपं नाही ते. कसं जाणार?" कर्डी म्हणाला.

"सोप्पं आहे. हा धागा आहे ना पुढचा रस्ता दाखवायला!" कर्डीला तिचे बोलणे काही कळले नाही. "थांब, आधी माझा खोदकाम करायचा टिकाव कुठे गेला आहे, तो शोधतो." तो म्हणाला. कर्डीला त्याचा टिकाव काही मिळाला नाही, पण एक विझलेली मशाल मात्र मिळाली. तिथल्याच निखाऱ्यांवर ती पेटवून त्याने पाहिले, तर तोपर्यंत राजकन्या तिथल्या एका अरुंद भुयारातून बरीच पुढे गेली होती.

तिला एकटीला कसे जाऊ द्यायचे, तिच्या काळजीने तोही भुयारात शिरला. भुयारातून एकामागोमाग एक कधी सरपटत, कसेबसे पुढे सरकत, कधी वाकत, कधी रांगत त्यांचा प्रवास सुरू झाला. हा रस्ता राजकन्येला कसा समजला, याचे कर्डीला राहून राहून आश्चर्य वाटत होते.

रस्ता हळूहळू मोठा होत गेला. त्यांना आता उभे राहून चालता येऊ लागले. काही पावले

चालून गेल्यावर ते अचानक एका मोठ्या दालनासारख्या गुहेत आले.

"थांब!" कर्डी हळू आवाजात उद्‌गारला. मशालीच्या अंधुक उजेडात तिथे त्याला एक लांबरुंद कट्टा दिसला होता. त्यावर मेंढ्यांची कातडी पसरली होती, आणि तिथे दोन जरा भेसूरच दिसणाऱ्या व्यक्ती हातपाय पसरून गाढ झोपल्या होत्या. गॉब्लिन्सचे राजाराणी! आणि राणीच्या हाताजवळच कर्डीचा टिकाव पडला होता!

कर्डीने त्याच्या हातातील मशाल राजकन्येकडे दिली. "याचा उजेड त्यांच्या चेहऱ्यावर पडू देऊ नको." त्याने सांगितले. मग तो हलकेच कट्ट्याजवळ गेला, आणि त्याने आपला टिकाव उचलला. राणीच्या पायात तिचे ग्रॅनाइटचे बूट होते. ते बूट म्हणजे तिचे प्रभावी शस्त्र! झोपतानासुद्धा ती ते काढत नसे. ते तिच्या पायात असताना एकाही माणसाला तिचा सामना करणे शक्य नव्हते! ओहो! कर्डीला वाटले, ही तर फार नामी संधी आहे. त्याने हळुवार हाताने तिच्या एका पायातील बूट काढून घेतला. पण दुसऱ्या पायातील बुटाला त्याने हात लावताच गुरगुरण्याचा आवाज काढत राणी उठून बसली. त्याबरोबर राजाही उठला.

"पळ, आयरीन!" कर्डी ओरडला. त्याला स्वतःच्या जिवाची भीती नव्हती, पण आयरीन संकटात सापडायला नको होती.

आयरीनला क्षणात सगळा अंदाज आला. ती पळून गेली नाही, राजकन्येला तसे करणे शोभलेच नसते. तिने लगेच मशाल विझवली. "कर्डी, पटकन माझा हात पकड," ती म्हणाली.

कर्डीने एका हातात टिकाव आणि राणीचा एक बूट धरून दुसरा हात अंदाजाने राजकन्येच्या हातात दिला. तिच्या दुसऱ्या हाताचे बोट धाग्यावर होतेच. न घाबरता ते दोघे वेगाने पुढे निघाले. गॉब्लिन राजाराणी नीट जागे होऊन मशाली पेटवून काय झाले हे बघेपर्यंत ते गुहेच्या पार आणि दुसऱ्या भुयारातून कितीतरी दूर पोचले होते. पण अजून धोका पूर्ण टळला नव्हता. दुसऱ्या एखाद्या रस्त्याने येऊन गॉब्लिन त्यांना पकडतील, अशी शक्यता होतीच. त्यामुळे त्यांना थांबता येणार नव्हते. मध्येच कुठून तरी ठोकण्याचा आवाज येई, तर कधी खणण्याचा. म्हणजे आजूबाजूला गॉब्लिन्सचा वावर होताच. बोटाने धाग्याचा माग धरत आयरीन पुढे चालली होती, आणि तिच्याबरोबर कर्डी. एके ठिकाणी त्यांना जमीन दुभंगून खाली जाणारा रस्ता दिसला. त्या रस्त्याने जायचे की नाही?

"माझा धागा तर तोच रस्ता दाखवतो आहे," राजकन्या म्हणाली.

"कसला धागा?" कर्डीने विचारले. किती प्रयत्न केला, तरी कर्डीला तो धागा दिसतही नव्हता, आणि बोटाला जाणवतही नव्हता.

"चल लवकर, कर्डी, या रस्त्यावर पाणी वाहतंय जोरात, पण ते खोल नाहीये, चल, चल."

आयरीनच्या पाठोपाठ जाताना कर्डीला सारखी धाकधूक वाटत होती, आपण पुन्हा वळून डोंगराच्या

पोटात तर जाणार नाही ना? मध्येच रस्ता खूप निमुळता झाला, तर टिकावाचे घाव घालून कर्डी तो रस्ता थोडा मोठा करत होता. बरेच अंतर गेल्यावर त्यांना प्रकाशाची तिरीप दिसायला लागली. त्यानंतर एखादेच मिनिट ते चालले असतील, एकदम आलेल्या झळझळीत सूर्यप्रकाशात क्षणभर त्यांचे डोळेच दिपले. नीट दिसू लागल्यावर पाहतात तो काय, ते चक्क राजवाड्याच्या बागेतच येऊन पोचले होते! आनंदाने हात पसरून नाचत राजकन्या म्हणाली, "बघ, आता तरी पटलं ना तुला, माझी आजी, तिने दिलेला धागा, तो धरून मी कशी तुझ्यापर्यंत आले, आपल्याला बाहेर यायचा रस्ता कसा सापडला..."

कर्डीला खरे म्हणजे अजूनही तो धागाबिगा हा कल्पनेचा खेळच वाटत होता. नंतर त्याचा त्यावर विश्वास कसा बसला ती एक आणखी वेगळी गोष्ट आहे.

***

-धनवंती हर्डीकर
dhanavanti@gmail.com
(शिक्षणतज्ज्ञ)

(कथेतील चित्रं इंटरनेटवरून साभार)

माणसांनो, मी तुमचा मित्र आहे आणि तुमच्या भल्यासाठीच वळवळ करतो!



बिनविषारी साप-

१) दूध व लाह्या हे माझ्यासाठी विषासारखे आहे.

२) मला ऐकू येत नाही, माझ्या रक्षणासाठी मी हालचाल करतो.

३) मी उंदीर खाऊन तुमचे अन्नधान्य वाचवतो.

४) मला पकडून माझी पूजा करण्यापेक्षा कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कागदाची, मातीची प्रतिकृती करून त्याची पूजा करा.

५) मी डूक धरत नाही, कारण माझी स्मरणशक्ती विकसित झालेली नाही.

६) आम्हा कुठल्याही सापाच्या डोक्यावर नागमणी नसतो.

विषारी साप-

१) सर्पदंशावर प्रति सर्पविष हेच एकमेव औषध आहे.

२) माणसाच्या अंगात गेलेले आमचे विष मंत्रतंत्राने उतरत नाही.

३) मीही उंदीर खाऊन तुमचे अन्नधान्य वाचवतो.

४) सर्पदंश झाल्यावर, वेळ न घालवता त्वरित दवाखान्यात नेणे हा एकमेव उपाय आहे.

५) मी स्वतःहून कोणालाच त्रास देत नाही. मला त्रास दिला तर मी दंश करतो.

६) सापाची हत्या करणे, त्यांच्या अवयवांचा वापर करणे हा गुन्हा आहे व त्याला शिक्षा होऊ शकते.

माझे किशोरवय

डॉ. मोहसीना मुकादम

वेगवेगळे खाद्यपदार्थ खायला आपल्या सगळ्यांनाच आवडतात. खाद्यसंस्कृतीचा, खाद्यपदार्थांच्या इतिहासाचा शोध घेणं हे सुद्धा किती आनंददायी असू शकतं हे डॉ. मोहसीना मुकादम यांना भेटल्यावर समजतं. 'फूड हिस्टरी' या विषयात Ph.D. करणाऱ्या मोहसीना मॅडम यांना खाद्यसंस्कृती क्षेत्रातल्या योगदानाबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मुंबईच्या रुईया महाविद्यालयाच्या इतिहास विभागातून 'असोशिएट प्रोफेसर' म्हणून त्या या वर्षीच सेवानिवृत्त झाल्या. किशोरवयापासून त्यांना या विषयाबद्दल कसं आकर्षण वाटलं, ते जाणून घेऊ या.

माझे डॅडी 'बेस्ट'मध्ये नोकरी करत होते. माझं लहानपण मुंबईत, परळच्या 'बेस्ट कॉलनी'मध्ये गेलं. के.जी. ते दहावीपर्यंतचं सगळं शिक्षण परळच्या 'आर. एम. भट' शाळेमध्ये झालं. घरी माझे मम्मी-डॅडी, धाकटा भाऊ आणि आजी असे आम्ही सगळेजण होतो. चुलत भावंडं, गावाहून येणारे पाहुणे वगैरे अधूनमधून येत असायचे. आमच्या बेस्ट कॉलनीत अगदी आपुलकीचं, घरगुती वातावरण असायचं. कोणताही सण जवळ आला की काही ना काही वैशिष्ट्यांमुळे त्या सणांची चाहूल आधीपासूनच लागत असे. म्हणजे, होळीच्या आधी आम्ही सगळेजण आट्यापाट्या खेळायचो. एरवी वर्षभरात हा खेळ आम्ही कधीच खेळायचो नाही.

गणेशोत्सवाच्या आधीपासूनच गणपतीच्या मूर्ती तयार करण्यासाठी जी माती वापरली जाते, त्या मातीचा सुवास वातावरणात भरून राहायचा. कोजागिरी पोर्णिमासुद्धा कॉलनीत उत्साहाने साजरी केली जायची. दिवाळी जवळ आली की घराघरांतून फराळाच्या पदार्थांचे सुगंध दरवळायचे. त्यामुळे सगळ्या सणांचा आनंद आम्हांला पुरेपूर

घेता यायचा.

लालबाग हा सार्वजनिक गणपती उत्सवासाठी प्रसिद्ध भाग. त्या काळातल्या गणेशोत्सवातल्या खूप आठवणी सांगण्यासारख्या आहेत. गणेशोत्सवात आम्ही रात्रीची जेवणं झाली की कॉलनीतले खूप जण मिळून गणपती बघायला बाहेर पडायचो. जवळपासचे सगळे गणपती बघून अगदी पहाटे पहाटे घरी परत यायचो. शिवाय घरोघरी आरत्या म्हणायलाही जायचो. कॉलनीत वेगवेगळ्या जातिधर्मांचे लोक राहात होते. त्यामुळे हिंदू धर्माची माहिती मला मिळाली. आपल्यासारख्या सांस्कृतिक वैविध्य असणाऱ्या समाजासाठी हे असं सगळ्यांनी मिळून मिसळून राहणं ही खूप समृद्ध करणारी गोष्ट आहे, असं मला वाटतं. आमच्या कॉलनीत दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी सिनेमा दाखवला जायचा. शाळेतूनही आम्हांला चांगले सिनेमे बघायला घेऊन जात असत.

गणेशोत्सवात आमच्या कॉलनीत नाटकं, खेळ, नृत्यस्पर्धा असे बरेच कार्यक्रम असायचे. मला नृत्याची खूप आवड होती. एकदा गणेशोत्सवात आमचं समूहनृत्य होतं. त्यात 'सु स्वा ग त म्' अशी अक्षरं लिहिलेला एकेक बोर्ड प्रत्येकाने हातात धरायचा होता. त्या नाचासाठी खास म्हणून माझ्या डॅडींनी माझ्यासाठी हौसेने नवा परकर-पोलका शिवायला टाकला होता. पण तो नवा परकर-पोलका अगदी आमचा नाच सुरू व्हायची वेळ आली तरी मिळाला नव्हता. शेवटी अगदी स्टेजवर जायच्या आधी तो परकर-पोलका हातात मिळाला आणि तो घालून मी स्टेजवर नाच केला! त्या परकर-पोलक्याचं महत्त्व खूप होतं, कारण माझे डॅडी खूप चोखंदळ आहेत. त्यांचा चॉइस उत्तम असतो. कपडे असोत, पुस्तकं असोत किंवा खाद्यपदार्थ असोत, त्यांची निवड एकदम छान असते.

मला वाचनाची आवड त्यांच्यामुळेच लागली. त्या काळात मर्यादित पगार, घरात मर्यादित जागा असं सगळं असतानाही ते पुस्तकं आवर्जून विकत घेऊन वाचत. त्यांच्याकडे 'संपूर्ण गडकरी' असा राम गणेश गडकरी यांच्या साहित्याचा संच होता; आजही आहे. 'दीपावली' नावाचा अंक तेव्हा प्रसिद्ध होता. 'दीपावली' अंकावर दीनानाथ दलाल यांची अतिशय सुंदर चित्रं असत. डॅडींनी ती सगळी मुखपृष्ठं व्यवस्थित कापून बाइंड करून फक्त मुखपृष्ठांचा असा एक ऐवज तयार केलाय. आमच्या कॉलनीत एक गृहस्थ फिरतं वाचनालय चालवायचे. आमच्या शाळेचं वाचनालयसुद्धा खूप चांगलं होतं. तिथे 'संत' म्हणून एक ग्रंथपाल होते, ते वाचनासाठी आम्हांला खूप चांगली पुस्तकं सुचवायचे. आम्ही जेव्हा ट्रेनने लांबच्या प्रवासाला जायचो तेव्हाही स्टेशनवर पुस्तक विकत घेऊन प्रवासात ते वाचायचो. काही ऐतिहासिक पुस्तकं आमच्या घरात होती आणि मी ती किशोरवयातच वाचली होती. त्यामुळे तेव्हाच कुठेतरी मनात इतिहासाची आवड निर्माण झाली होती.

माझ्या किशोरवयात घडलेली एक घटना आवर्जून सांगण्यासारखी आहे. १९७५ ते ७७ दरम्यान भारतात आणीबाणी लागू झाली होती. ती संपल्यावर जी निवडणूक झाली, त्यात जनता पक्षाचं सरकार निवडून आलं. त्या निवडणुकीनंतर डॅडी आमच्या भागातल्या मतमोजणी सुरू असलेल्या ठिकाणी गेले होते. ते तिथून परत आल्यावर निवडणूक निकालाच्या आनंदाच्या भरात आमच्या कॉलनीतल्या लोकांनी डॅडींनाच खांद्यावर घेऊन नाचायला सुरुवात केली होती! हे दृश्य मी जवळून पाहिलं, आणीबाणीचा काळही माझ्या किशोरवयात अनुभवला. पुढे कॉलेजमध्ये इतिहास विषय शिकवायला सुरुवात केल्यावर त्यात आणीबाणीवरचा धडा शिकवताना मला हे सगळं आठवत होतं.

माझ्या जडणघडणीत शाळेचाही मोठा वाटा आहे. आम्ही मधल्या सुट्टीत सगळेजण एकत्र बसून डबा खायचो. त्यामुळे साहजिकच इतरांच्या डब्यात काय वेगळं आहे ते बघायची उत्सुकता मला असायची. एखादा वेगळा पदार्थ असेल तर त्याची रेसिपीसुद्धा मी आवर्जून विचारून घ्यायचे. कॉलनीत आमच्या शेजारी एका बाजूला कन्नड आणि दुसऱ्या बाजूला ख्रिश्चन कुटुंब राहायचं. त्यांचे पदार्थही खूप इंटरेस्टिंग असायचे. त्या कानडी काकू सांबार खूप छान करायच्या. दुसऱ्या एका काकूंनी त्यांचे खास असे रव्याचे लाडू मला शिकवले. माझी आजी आणि आई उत्तम स्वयंपाक करत असत. त्यांच्याकडून, मित्र-मैत्रिणींच्या आयांना स्वयंपाक करताना पाहून मालवणी वगैरे बरेच पदार्थ मी शिकले. माझे डॅडी एकदम खवय्ये आहेत. त्यांना खायला आणि खिलवायलाही खूप आवडतं. मी लहान असताना ते सुट्टीच्या दिवशी मला फिरायला घेऊन जायचे. टॉम अँड जेरीचा नवा सिनेमा आला की तो बघायला टाऊनला घेऊन जायचे. तेव्हा म्हातारीचा बूट बघायला, हँगिंग गार्डनला खेळायला गेलं की 'नाझ' रेस्टॉरंटमध्ये 'फ्रेंच फ्राईज' खाणं हे ठरलेलं असायचं. आता फ्रेंच फ्राईज अगदी सहज कुठेही मिळतात, पण तेव्हा ते त्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन खाणं म्हणजे अप्रूप असायचं. माटुंग्याला 'महेश्वरी उद्याना'त खेळायला गेलं की तिथले आसपासचे दाक्षिणात्य पदार्थ, दादरला 'ज्योती'मधला बटाटेवडा हे पदार्थ तेव्हा डॅडी आवर्जून खाऊ घालत. त्यामुळे माझ्या मनात खाद्यपदार्थांविषयीची आवड निर्माण झाली.

डॉ. मोहसीना आजीसोबत

दहावीनंतर मला खरंतर केटरिंग कॉलेजला जायचं होतं, पण तेव्हा त्या क्षेत्राची फारशी माहिती नव्हती आणि मार्गदर्शन करणारंही कोणी नव्हतं, त्यामुळे मी महर्षी दयानंद महाविद्यालयात प्रवेश घेतला. अर्थात त्यामुळे एक प्रकारे माझा फायदाच झाला. कारण मला इतिहास आणि खाद्य-संस्कृती अशा दोन्ही विषयांचा अभ्यास करता आला!

डॅडींनी फिलॉसॉफी घेऊन बी.ए. केलं होतं आणि मी बारावीत असताना त्यांनी पुणे विद्यापीठातून एम.ए.सुद्धा केलं. मम्मी एस्.एस्.सी झालेली आहे, तीही एकदम तरतरीत. ती रोज घरी येणारी वर्तमानपत्रं वाचते, मासिकं वाचून त्यातली महत्त्वाची कात्रणं कापून नीट जपून ठेवते, ती माणसं खूप चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकते. आमच्या घरात अगदी मोकळं वातावरण होतं; आजही आहे. मम्मी-डॅडींचं काही चुकलं किंवा एखादा निर्णय पटला नाही तरी मी अगदी मोकळेपणाने त्यांना ते सांगू शकते. माझ्या मम्मी-डॅडींनी अभ्यासासाठी कधीच माझ्यावर दडपण आणलं नाही. ते आयुष्याचा आनंद घेणारे, त्यातलं सौंदर्य जाणणारे आहेत. उत्तमोत्तम पुस्तकं वाचणं, चांगले सिनेमे पाहणं, वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेणं अशा सगळ्याच गोष्टींशी त्यांनी माझी ओळख करून दिली.

असं सगळं दर्जेदार अनुभवताना त्यामागचे परिश्रम जाणवायचे. त्यातून संशोधक वृत्ती रुजली असावी. खाण्याच्या पदार्थांकडे नुसतं गंमत म्हणून बघण्यापेक्षा आपल्या संस्कृतीतला तो एक महत्त्वाचा घटक आहे हे लक्षात आलं.

-शब्दांकन : अंजली कुलकर्णी-शेवडे
anjalicoolkarni@gmail.com
(प्रसिद्ध निवेदिका)

अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
वयम्
आपण सारे
ऐकता ऐकता
वाचू या!
गोष्टी
English
गप्पाटप्पा
कल्पक
शब्दरंजन
चौकस-चौरस
लवकरच येत आहे..
मुलांचं आवडतं
वयम् मासिक आता श्रवणीय! -
वयम् ॲप
GET IT ON Google Play
Download on the App Store
www.wayam.in | 7045453343

अहम् आवाम्
वयम्
कल्याण, चौकस किशोरांचे मासिक

'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७० इमेल : info@wayam.in वेबसाइट : www.wayam.in

वाचकांमध्ये 'वयम्'ची लोकप्रियता वाढत आहे. 'वयम्'चे सभासदत्व घेण्यास उत्सुक असलेल्यांच्या सोयीसाठी आमच्या प्रतिनिधींची ही यादी. हे 'वयम्' प्रतिनिधी म्हणजे 'वयम्'चा प्रसार प्रेमाने करणारे दूत आहेत.

'वयम्' प्रतिनिधी

पुणे (पिंपरी-चिंचवड)
सुप्रिया पुराणिक
7030360758

गोरेगाव-मुंबई
अनघा अनिल चंद्रात्रे
8080550353

पालघर
मनोविकास ग्रंथोत्सव
9967081527

गिरगाव-मुंबई
मेसर्स बी.डी.बागवे एजन्सी
7506000869

वरळी-मुंबई
संजना चव्हाण
9221969336

डोंबिवली
सुनिल पांचाळ
9930016920

कल्याण
डॉ. योगेश जोशी
9757077614

कल्याण
विकास वाचनालय (DSK)
9819931421

बदलापूर
नेत्रा नरवणे
9604677297

अलिबाग
श्रुती संतोष बोंद्रे
9423381129

रत्नागिरी
गार्गी केदार देवस्थळी
9404331020

कणकवली-मालवण
सुषमा केणी
9284035326

वेंगुर्ला-सिंधुदुर्ग
मधुरा नित्यानंद आठलेकर
9405925454

उदगीर
नितीन दुरुगकर
9579018581

कराड
संजय पुजारी (डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्र)
9226163260

नांदेड
शिवाजी आंबुलगेकर
9423440598

लातूर
ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र
9421693089

लातूर
वैद्य जयश्री कुलकर्णी
9326190749

बुलढाणा
मैत्री नरेंद्र लांजेवार
7666407475

कोल्हापूर
डॉ. धनश्री खाडे
9604636893

अकोला
उत्कर्ष जैन
9850263103

***SWS* फायनान्शिअल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड**

नाशिक
रुपाली कुलकर्णी
9011896681

मुंबई
किशोर काळे
9869239940

ऑनलाइन इंग्रजी बोलायला शिकण्याची 'वयम्'च्या वाचकांसाठी सुवर्णसंधी. केवळ 2000/- रुपये भरा आणि एक महिना ऑनलाइन क्लास आणि दोन वर्षांसाठी 'वयम्'चे सभासदत्व मिळवा. **विद्यार्थी, शिक्षक, महिलांसाठी स्वतंत्र बॅच.**

THE KINGS' English Academy

संपर्क- प्रा. श्रुती राजे
8421113111
9822240106

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्
वयम्
आपण घडवू

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५
इमेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in

सभासद नोंदणी फॉर्म

१ वर्ष
₹ ११००/-
डिलिव्हरी चार्जेससहित

१० + १ दिवाळी अंक

scan here to pay

नोंदणी क्रमांक : ..... दिनांक : .....

नाव : .....

पत्ता : .....

..... पिन कोड : .....

जवळची खूण : .....

फोन : ..... इमेल : .....

जन्मतारीख : ..... इयत्ता : .....

शाळा : .....

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : ..... बँक व बँक शाखा : .....

चेक दिनांक : ..... रुपये : .....

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती-

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd. Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा. सही : .....

'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2020-22 Post at Mumbai Patrika Channel Sorting Office G.P.O. Mumbai 400 001
Published on 1st of every month and posted on 5th of every month

50 Years Of Banking Excellence

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

एका समृद्ध ग्रीन भविष्याची करु सुरुवात

टीजेएसबी ग्रीन कार लोन सोबत

व्याजदर 7.70%* पासून

₹50 लाखांपर्यंत कर्ज

100% कर्ज उपलब्ध

*अटी लागू

आजच आपली इ-कार घरी घेऊन या !

Toll Free : 1800 223 466 / 1800 266 3466
www.tjsbbank.co.in